# नागरिकांची सनद

गृह (तुरुंग) विभाग

महाराष्ट्र शासन

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

वि (वाय) १६१२–१

सत्यमेव जयते

# उपमुख्यमंत्री

## महाराष्ट्र राज्य

## शुभेच्छा

दिनांक

कारागृह विभागाची "नागरिकांची सनद" पुस्तिका प्रकाशित होत असल्यामुळे मला आनंद होत आहे.

राज्यातील कारागृहांमध्ये कैद्यांचे पुनर्वसन करणे, त्यांच्यामध्ये सुधारणा घडवून आणणे आणि त्याद्वारे गुन्हेगारीला आळा घालणे अशा महत्त्वाच्या भूमिका बजावल्या जातात. सामाजिक दृष्टिकोनातून अभ्यास करणाऱ्या सामाजिक संस्थांना या प्रकाशनातील कारागृहासंबंधीची अद्ययावत माहिती निश्चितपणे उपयुक्त ठरू शकते व ते सर्वांना साहाय्यभूत होईल असा मला विश्वास वाटतो.

कारागृह विभागाच्या "नागरिकांची सनद" या प्रकाशनाला माझ्या हार्दिक शुभेच्छा !

**आर. आर. पाटील**

**राज्यमंत्री**
**गृह, तुरुंग व फलोत्पादन**
महाराष्ट्र शासन मंत्रालय,
मुंबई-४००० ०३२.

दिनांक :

# शुभ संदेश

कारागृह विभागाची "नागरिकांची सनद" या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात येत आहे. शासनाची प्रशासकीय कार्यपद्धती सामान्य जनतेस माहिती व्हावी व त्यांच्यामार्फत लोकशाहीमूल्य बळकटीकरणास मदत व्हावी यासाठी सदरचे प्रकाशन अत्यंत महत्त्वाचे व उपयुक्त आहे.

सदर पुस्तिका प्रकाशनास माझ्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा !

**सिद्धाराम म्हेत्रे**

**चित्कला झुत्शी**

**अपर मुख्य सचिव (गृह)**

# संदेश

कारागृह विभागाची "नागरिकांची सनद" या पुस्तिकेचे प्रकाशन होत असल्यामुळे मला अतिशय आनंद होत आहे. कारागृह प्रशासनाची कार्यपद्धतीबाबतची माहिती व्यापक प्रमाणात समाविष्ट करण्यात आलेली आहे. या पुस्तिकेतील माहितीचा सर्व लोकांना उपयोग होईल अशी मी आशा व्यक्त करते.

**चित्कला झुत्शी.**

**ॲना दाणी,**

**प्रधान सचिव (तुरुंग).**

# संदेश

कारागृह प्रशासनाच्या वतीने कारागृह विभागाची "नागरिकांची सनद" ही पुस्तिका प्रकाशित होत असताना मला अत्यंत आनंद होत आहे.

सदर पुस्तिकेमध्ये कारागृहात बंदिस्त असलेल्या सिद्धदोष व न्यायाधीन बंद्यांना देण्यात येणाऱ्या सुविधा याबाबतची माहिती सुयोग्यरित्या दिलेली आहे.

सदर पुस्तिकेचा, कारागृह विभागाचा कारभार पारदर्शी होण्यास आणि बंद्यांचे सहकार्य मिळण्यासाठी निश्चितच उपयोग होईल अशी मी आशा बाळगते.

सदर प्रकाशनास माझ्या हार्दिक शुभेच्छा !

**ॲना दाणी**

# अनुक्रमणिका


| अनु-क्रमांक | | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | | २ | ३ |
| १ | (अ) | कारागृह प्रशासन .. | १ |
| २ | (ब) | महाराष्ट्र कारागृह विभागाची संस्थात्मक रचना .. | २ |
| ३ | (क) | संघटन आराखडा .. | ५ |
| ४ | (ड) | महाराष्ट्र राज्यातील विभागनिहाय कारागृहे .. | ६ |
| ५ | (इ) | कारागृहातील बंद्यांना देण्यात येणाऱ्या सुविधा .. | ८ |
| ६ | १. | बंद्यांचा कारागृह प्रवेश .. | ८ |
| ७ | २. | क्वारंटाईन पिरीएड .. | ९ |
| ८ | ३. | कारागृह दैनंदिनी .. | ९ |
| ९ | ४. | कारागृहात बंद्यांसाठी निवासव्यवस्था .. | १० |
| १० | ५. | कारागृहातील बंद्यांना कपडे, बिस्तरा व इतर गरजेच्या वस्तू पुरविणे. | ११ |
| ११ | ६. | कारागृहातील बंद्यांना देण्यात येणारा आहार .. | १२ |
| १२ | ७. | कारागृहात बंद्यांसाठी असलेली वैद्यकीय सुविधा .. | २४ |
| १३ | ८. | वैयक्तिक स्वच्छतेसाठी देण्यात येणाऱ्या सवलती.. | २५ |
| १४ | ९. | बंद्यांचे शास्त्रीय वर्गीकरण .. | २६ |

# अनुक्रमणिका--चालू


| अनु- क्रमांक | | तपशील | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ३ |
| १५ | १०. | बंद्यांसाठी भेटीची सवलत | .. | २६ |
| १६ | ११. | पत्रव्यवहार | .. | २७ |
| १७ | १२. | वर्तमानपत्रे | .. | २८ |
| १८ | १३. | कायदेविषयक मदत | .. | २८ |
| १९ | १४. | वेतनपद्धत व आर्थिक व्यवहार | .. | २९ |
| २० | १५. | बंद्यांसाठी उपाहारगृह | .. | २९ |
| २१ | १६. | बंद्यांसाठी खेळ व करमणूक | .. | ३० |
| २२ | १७. | बंद्यांसाठी सण व उत्सवांचे आयोजन | .. | ३० |
| २३ | १८. | शैक्षणिक कार्यक्रम | .. | ३१ |
| २४ | १९. | औद्योगिक प्रशिक्षण शाळा | .. | ३२ |
| २५ | २०. | माफी पद्धत | .. | ३२ |
| २६ | २१. | बंद्यांना अभिवचन व संचित रजेची सवलत | .. | ३३ |
| २७ | २२. | बंदी अधिकारी पद्धत | .. | ३६ |
| २८ | २३. | बंदी कल्याण निधी | .. | ३६ |
| २९ | २४. | रेसीप्रोकल ट्रान्सफर | .. | ३६ |
| ३० | २५. | सल्लागार मंडळ व १४ वर्षीय अहवाल | .. | ३७ |

# अनुक्रमणिका--समाप्त


| अनु-क्रमांक | | तपशील | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ३ |
| ३१ | २६. | तक्रार पेटी | .. | ३७ |
| ३२ | २७. | बंदी पंचायत व्यवस्था | .. | ३८ |
| ३३ | २८. | खुले कारागृह व खुल्या वसाहती | .. | ३८ |
| ३४ | (फ) | कारागृहात बंद्यांना बाळगण्यास निषिद्ध असणाऱ्या वस्तू. | | ३९ |
| ३५ | (ग) | कारागृहातील बंद्यांनी शिस्तीबाबत पाळावयाचे मार्गदर्शन. | | ४० |
| ३६ | (ह) | बंद्यांना कारागृहात देण्यात येणाऱ्या शिक्षा | .. | ४१ |
| ३७ | (ज) | बंद्यांच्या हक्कांची जोपासना | .. | ४१ |
| ३८ | (ल) | भारतीय घटनेने प्रदान केलेले हक्क | .. | ४१ |
| ३९ | (म) | बंद्यांना मोफत कायदेविषयक मदत/सल्ला | .. | ४२ |
| ४० | (न) | राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची अपेक्षा | .. | ४५ |
| ४१ | (प) | विभागाकडून पुरविली जाणारी सेवा, सेवा पुरविणारा अधिकारी इत्यादींचा तपशील. | | ४६ |
| ४२ | (र) | गृह (तुरुंग) विभाग व विभागाच्या नियंत्रणाखालील क्षेत्रीय कार्यालयांचे दूरध्वनी क्रमांक. | | ४९ |

# (अ) कारागृह प्रशासन

राज्यात मध्यवर्ती कारागृहे, जिल्हा कारागृहे, किशोर सुधारालय, खुले कारागृह व खुली वसाहत मिळून एकूण ३८ कारागृहे आहेत. या कारागृहामध्ये बंद्यांची क्षमता १७,७६७ (पुरुष १६,८२४ व महिला ९४३) इतकी आहे. मात्र प्रत्यक्षात या कारागृहातील बंद्यांची संख्या क्षमतेपेक्षा ८ ते १० हजारांनी अधिक असते. कारागृहे गृह विभागाच्या अंतर्गत असून राज्यातील कारागृहाचे प्रशासन व नियंत्रण याची जबाबदारी कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे सोपविली आहे. त्यांच्या मदतीकरिता राज्यात ४ कारागृह उपमहानिरीक्षक आहेत. कारागृह उपमहानिरीक्षकांच्या नियंत्रणाखाली राज्यातील मध्यवर्ती, जिल्हा, किशोर सुधारालय, खुले कारागृह व खुली वसाहत यांचे अधीक्षक काम करीत आहेत.

**उद्देश**

पुनर्वसनासाठी गुन्हेगारांची सुधारणा हे ध्येय ठेवून तुरुंग कायदा, १८९४ नुसार महाराष्ट्रातील कारागृहांची स्थापना झाली आहे. अस्तित्वात असलेल्या कायद्याच्या विरुद्ध वर्तन करून गुन्हा करणाऱ्या गुन्हेगारांना समाजाच्या शांतता व स्वास्थतेच्या दृष्टिकोनातून काही काळ एकांतवासात ठेवणे हा उद्देश कारागृहाची स्थापना करण्यामागे आहे. गुन्हेगारांना सुधारण्यासाठी कारागृहामध्ये योजनाबद्ध कार्यक्रम राबविले जातात. या कार्यक्रमामध्ये वैचारिक उपदेश, कायद्याचे मार्गदर्शन, शिक्षण, आरोग्याच्या दृष्टिकोनातून जीवन जगण्याची कला इत्यादींचा समावेश आहे. कैद्यांच्या शिक्षा कालावधीचा उपयोग त्यांच्या वर्तणुकीत आवश्यक त्या सुधारणा करून गुन्हेगारी प्रवृत्तीपासून त्याला दूर ठेवणे याकरिता केला जातो.

कारागृह विभागाची कार्ये थोडक्यात खालीलप्रमाणे आहेत.--

(१) कैद्यांचा सांभाळ करणे व खालीलप्रमाणे कायद्यांचे प्रशासन करणे.--

तुरुंग कायदा, १८९४.

कैदीविषयक कायदा, १९००.

किशोर सुधारणा कायदा, १९२९.

कैद्यांचा स्थलांतरविषयक कायदा, १९५०.

अपराधी परिविक्षा अधिनियम सराईत अपराधी विषयक कायदा, १९६०.

(२) कैद्यांच्या गुन्हेगारी जीवनाचा व त्याला गुन्हेगारी जीवनाकडे नेणाऱ्या त्याच्या जीवनातील घटनांचा अभ्यास करणे तसेच या अभ्यासात कैद्यांची आर्थिक व मानसिक स्थिती, त्याची कौटुंबिक परिस्थिती, गुन्हेगारी करण्याची पद्धती, त्यांचे शेजाऱ्याबरोबर असलेले संबंध व वागणूक तसेच समाजविघातक व्यक्तींशी त्याचे असलेले संबंध व वागणूक कशी होती व त्यातून त्याची गुन्हेगारी प्रवृत्ती कशी वाढली याचाही अभ्यास करणे प्राप्त असते.

(३) गुन्हेगाराच्या वागणुकीत सुधारणा होईल हे गृहित धरून त्याला शिक्षण व मार्गदर्शन करणे तसेच हे शिक्षण घेण्यास त्याचे मन तयार करणे.

(४) त्यांना निरनिराळे धंदेवाईक शिक्षण उपलब्ध करून देणे.

(५) त्याची सुटका झाल्यानंतर त्याचे पुनर्वसन करण्याची योजना आखणे. त्यात डी. पी. ओ. मार्फत कर्ज योजना तसेच विविध योजनेअंतर्गत सुविधांची माहिती देणे, थोडक्यात सुरक्षितता, शिस्त, सुधारणा, पुनर्वसन, शिक्षण व कैद्यांचे कल्याण ही कारागृह विभागाची महत्त्वाची कार्ये आहेत.

## (ब) महाराष्ट्र कारागृह विभागाची संस्थात्मक रचना

कारागृहाचे प्रशासन व त्याचे नियंत्रण करण्याचे काम कारागृह महानिरीक्षक यांच्याकडे सोपविलेले आहे. त्यांचे मुख्यालय पुणे येथे आहे. त्यांच्या मदतीकरिता पुणे येथील त्यांच्या कार्यालयात कारागृह उपमहानिरीक्षक, विधी अधिकारी, संशोधन अधिकारी, लेखा अधिकारी, उपअभियंता, उद्योग अधीक्षक, कृषी अधिकारी इत्यादी मदत करत असतात. प्रशासनाच्या सोईसाठी राज्यात चार विभाग निर्माण करण्यात आलेले आहेत. त्यांचे प्रमुख कारागृह उपमहानिरीक्षक हे आहेत.

(१) **क्षेत्रीय कार्यालयाची रचना**.--राज्यात कारागृहाचे प्रशासन चार विभागीय कार्यालयांमार्फत हाताळण्यात येते.

पूर्व विभाग, नागपूर.

पश्चिम विभाग, पुणे.

दक्षिण विभाग, मुंबई.

मध्य विभाग, औरंगाबाद.

या प्रत्येक कार्यालयाचे प्रमुख हे कारागृह उपमहानिरीक्षक हे आहेत.

(२) **मध्यवर्ती / जिल्हा कारागृहाची रचना**.--कारागहात न्यायाधीन, सिद्धदोष, स्थानबद्ध बंदी ठेवण्यात येतात. या कारागृहाचे प्रमुख अधीक्षक आहेत. कारागृहाचे दैनंदिन कामकाजाच्या मदतीकरिता उपअधीक्षक, तुरुंग अधिकारी, सुभेदार, हवालदार रक्षक हे कार्यकारी वर्गातील अधिकारी/कर्मचारी अधिपत्याखाली असून त्यांचेमार्फत कारागृहाची व बंद्यांची सुरक्षितता राखणे, बंद्यांना नियमाप्रमाणे दैनंदिन सुविधा उपलब्ध करणे, न्यायालयीन कामकाजासाठी बंद्यांना पोलीस पथकाकडे सुपूर्द करणे इत्यादींचे नियंत्रण केले जाते.

(३) **खुले कारागृह.**--शिक्षा लागलेल्या दीर्घ मुदतीच्या बंद्यांची ठरावीक काळ शिक्षा भोगल्यानंतर त्यांची वर्तणूक शारीरिक व मानसिक प्रकृती उत्तम असलेल्या व कष्टाचे काम करण्याची सवय असलेल्या बंद्यांना खुले कारागृह निवड समितीच्या शिफारशीवरून कारागृह महानिरीक्षक यांचे आदेशान्वये खुल्या कारागृहामध्ये ठेवण्यात येते. या कारागृहामध्ये बंद्यांना सुटकेनंतर त्यांचे पुनर्वसन व्हावे म्हणून त्यांना विविध उद्योगांचे आधुनिक प्रशिक्षण, काम व रोजगार तसेच नियमाप्रमाणे शिक्षेमध्ये बंद कारागृहापेक्षा जास्त माफी देण्यात येत. तसेच कामाच्या बदल्यात वेतन देण्यात येते. या कारागृहाचे प्रशासन अधीक्षकांमार्फत चालविण्यात येते व त्यांच्या मदतीकरिता उपअधीक्षक, तुरुंग अधिकारी, सुभेदार, हवालदार, रक्षक हे कार्यकारी संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांचेमार्फत नियंत्रण केले जाते.

(४) **खुली वसाहत.**--खुल्या कारागृहातील बंद्यांची निवड शासनामार्फत (गृह विभाग) करण्यात येते. या कारागृहातील बंद्यांना त्यांच्या कुटुंबीयांसमवेत राहण्याची मुभा आहे. खुल्या वसाहतीत बंद्यांना शेतीचे काम किंवा जवळपासच्या मान्यवर संस्थांकडे काम देण्याचे आयोजन कारागृह अधीक्षकांमार्फत केले जाते. या कारागृहाचे प्रशासन व नियंत्रण कारागृह अधीक्षक व इतर आवश्यक कर्मचाऱ्यांमार्फत केले जाते.

(५) **बंद्यांना कारागृहात ठेवण्याची व्यवस्था.**--कारागृह खात्यात सराईत गुन्हेगार नाशिक रोड व अमरावती मध्यवर्ती कारागृह येथे ठेवले जाते. विशेष बंदी म्हणून प्रमाणित केलेल्या बंद्यास रत्नागिरी विशेष कारागृहात ठेवले जाते.

(६) **किशोर सुधारालय.**--नाशिक येथे एक किशोर सुधारालय शाळा असून तेथे बाल गुन्हेगारांच्या फायद्यासाठी व्यवसाय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहेत. इयत्ता दहावीपर्यंतचे नेहमीचे शैक्षणिक वर्ग चालविले जातात. ज्या बाल गुन्हेगारांना पुढील उच्च शिक्षण घ्यावयाचे असेल त्यांना आवश्यक त्या सवलती दिल्या जातात. हिंदी, उर्दू इत्यादी भाषांचे वर्ग चालविले जातात. औद्योगिक प्रशिक्षणाकडे प्रवृत्ती असणाऱ्या विद्यार्थांना स्थानिक औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत पाठविले जाते. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडे प्रशिक्षणासाठी बाल गुन्हेगार पाठविण्याच्या पद्धतीचे परिणाम उत्साहवर्धक आहेत.

# (क) संघटन आराखडा

## कारागृह महानिरीक्षक

- कारागृह उपमहानिरीक्षक (मुख्यालय)
- कारागृह उपमहानिरीक्षक (विभाग)
- प्राचार्य (दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय)
- पोलीस उपअधीक्षक (दक्षता पथक)

**कारागृह उपमहानिरीक्षक (मुख्यालय)**

- गोपनीय विभाग
- न्याय विभाग
- आस्थापना विभाग
- लेखा विभाग
- रचना व कार्यपद्धती
- कृषी विभाग
- सांख्यिकी विभाग
- उद्योग विभाग
- विधी विभाग
- बांधकाम विभाग
- वस्त्रोद्योग विभाग

**कारागृह उपमहानिरीक्षक (विभाग)**

| कारागृह प्रकार | पूर्व विभाग, नागपूर | पश्चिम विभाग, पुणे | दक्षिण विभाग, मुंबई | मध्य विभाग, औरंगाबाद |
|---|---|---|---|---|
| मध्यवर्ती कारागृहे | २ | २ | २ | २ |
| जिल्हा कारागृहे | | | | |
| वर्ग-१ | ५ | -- | २ | १ |
| वर्ग-२ | १ | ५ | २ | ५ |
| वर्ग-३ | -- | १ | १ | -- |
| खुले कारागृह | -- | १ | -- | २ |
| किशोर सुधारालय | -- | -- | -- | १ |
| महिला कारागृह | -- | -- | १ | -- |
| विशेष कारागृह | -- | -- | १ | -- |
| खुली वसाहत | -- | १ | -- | -- |
| **एकूण ..** | **८** | **१०** | **९** | **११** |

# (ड) महाराष्ट्र राज्यातील विभागनिहाय कारागृहे

| कारागृह प्रकार | पूर्व विभाग | पश्चिम विभाग | दक्षिण विभाग | मध्य विभाग |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| **मध्यवर्ती कारागृह** | १. नागपूर<br>२. अमरावती | १. येरवडा, पुणे.<br>२. कोल्हापूर | १. मुंबई<br>२. ठाणे | १. औरंगाबाद<br>२. नाशिकरोड |
| **जिल्हा कारागृह वर्ग-१** | १. अकोला<br>२. भंडारा<br>३. चंद्रपूर<br>४. यवतमाळ<br>५. वर्धा | १. खुले कारागृह, येरवडा, पुणे. | १. कल्याण, जिल्हा ठाणे.<br>२. भायखळा, मुंबई.<br>३. विशेष कारागृह, रत्नागिरी. | १. खुले कारागृह, पैठण, जिल्हा औरंगाबाद.<br>२. धुळे<br>३. किशोर सुधारालय, नाशिक.<br>४. खुले कारागृह, औरंगाबाद. |
| **जिल्हा कारागृह वर्ग-२** | १. बुलढाणा | १. सातारा<br>२. सांगली<br>३. सोलापूर<br>४. अहमद-नगर. | १. अलिबाग<br>२. सावंतवाडी<br>३. मुंबई, जिल्हा महिला कारागृह. | १. परभणी<br>२. उस्मानाबाद<br>३. बीड<br>४. नांदेड<br>५. जळगाव |

| कारागृह प्रकार | पूर्व विभाग | पश्चिम विभाग | दक्षिण विभाग | मध्य विभाग |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | ५. विसापूर, जिल्हा अहमद-नगर. | | |
| | | ६. खुली वसाहत, आटपाडी, जिल्हा सांगली. | | |
| **जिल्हा कारागृह वर्ग-३** | -- | १. कोल्हापूर शहर. | १. जे. जे. समूह रुग्णालय, मुंबई. | -- |
| **एकूण ..** | ८ | १० | ९ | ११ |

# (इ) कारागृहातील बंद्यांना देण्यात येणाऱ्या सुविधा

## १. बंद्यांचा कारागृहात प्रवेश

कारागृहात न्यायाधीन बंदी, शिक्षा लागलेले, स्थानबद्ध, दिवाणी बंदी यांनी कारागृहात प्रथम दाखल केल्यानंतर खालील बाबी कारागृह अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार करावयाच्या असतात.

(अ) बंद्याने स्वत:जवळील रोकड रक्कम, दागिने व इतर मौल्यवान वस्तू कारागृह अधिकाऱ्यांकडे जमा करणे, या वस्तू बरोबर जमा केल्याबद्दलची बंदी अधिकाऱ्यांकडून खात्री करू शकतो. बंद्यांना सुटताना त्यांच्या वस्तू परत करण्यात येतात.

(ब) कारागृहात बंदी दाखल झाल्यावर नियमाप्रमाणे प्रशासनाकडून दैनंदिन वापरण्यासाठी थाळी, मग, वाटी देण्यात येते तसेच बंदी कपडे व बिस्तरा देण्यात येतो. बंदी न्यायाधीन असल्यास तसेच स्थानबद्धांना त्यांचे स्वत:चे कपडे वापरण्याची स्वत:चा बिस्तरा वापण्याची तरतूद आहे. परंतु न्यायाधीन बंदी स्वत:च्या बिस्तऱ्याची व्यवस्था करू शकला नाही तर त्याला कारागृहाकडून तो दिला जातो. भारतीय दंड विधान कलम ३०२ च्या खाली दाखल न्यायाधीन बंद्यांना सुरक्षा व्यवस्था म्हणून कैदी कपडे वापरणे सक्तीचे आहे. बंद्यांना शिक्षेनुसार तसेच नैमित्तिक, सराईत, पळपुटा हे ओळखता येण्यासाठी नियमाप्रमाणे त्यांच्या शर्टच्या बाहीवर पिवळी, निळी व लाल पट्टी लावली जाते.

(क) बंद्यास कारागृहात प्रवेश दिल्यावर त्याची वैद्यकीय तपासणी शासकीय रुग्णालयामध्ये करून त्याच्या अंगावरील खुणा संबंधित रजिस्टरमध्ये नोंदविण्यात येतात.

(ड) न्यायाधीन बंदी, शिक्षा झालेले बंदी, किशोरवयीन बंदी, स्थानबद्ध यांना वेगवेगळ्या विभागात प्रशासनाच्या सोईनुसार ठेवले जाते.

(ई) स्त्री बंद्यांना वेगळ्या स्वतंत्र व सुरक्षित कक्षात ठेवले जाते.

(फ) स्त्री बंद्यांसोबत असलेल्या ६ वर्षांखालील मुलांना त्यांच्या जवळ ठेवण्याची तरतूद आहे. अशा मुलांसाठी कारागृहात खेळणी व पोषक अन्न देण्याची व्यवस्था आणि बालवाडीची व्यवस्था देखील करण्यात येते.

## २. क्वारंटाईन पिरीएड

शिक्षा लागलेल्या बंद्यांना किमान १० दिवस या कक्षात ठेवून कारागृहाच्या एकूण नियमावलीचे व इतर बाबी, सवलतींबाबतची त्यांना माहिती करून दिली जाते. ज्या बंद्यांना ते कारागृहात आल्यामुळे त्यांच्या कौटुंबिक अडचणी, वैयक्तिक अडचणी याबाबत प्रशासन त्यांच्याशी मोकळेपणाने चर्चा करून अशा अडचणी पत्रव्यवहार करून व वाटल्यास कारागृहात कार्यरत असलेले परिविक्षा अधिकारी, कल्याण अधिकारी, संपर्क अधिकारी यांना समक्ष पाठवून त्या अडचणी सोडविण्यासाठी प्रशासन मदत करते.

## ३. कारागृह दैनंदिनी

कारागृहातील नियमाप्रमाणे बंद्याने सकाळी ५.१५ ते ५.३० या दरम्यान उठणे आवश्यक आहे. त्यानंतर सकाळची गिनती, प्रातर्विधी तसेच सकाळचा चहा, नाष्टा घेतल्यावर साधारणत: ७.३० ते ७.४५ च्या दरम्यान शिक्षा लागलेल्या बंद्यांना दिलेल्या कामावर जाणे आवश्यक आहे. सकाळचे जेवण १०.४५ पर्यंत संपवून परत कामावर गेल्यावर अर्धा तास विश्रांती घेतल्यावर ४.३० वाजता कामावरून परत येणे, नंतर खेळ व सायंकाळचे जेवण उरकल्यावर सायंकाळी ६.१५ म्हणजेच सूर्यास्ताच्या दरम्यान गिनती करून कारागृहाची बंदी केली जाते. रात्री ९.३० नंतर बंद्यांनी जागे राहू नये असा नियम आहे.

न्यायाधीन बंदींना काम देणेबाबत किंवा कामाची सक्ती करणेबाबत कायद्यात तरतूद नसल्यामुळे सकाळचे जेवण आटोपल्यावर साधारणत: दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत त्याने आपल्या बॅरॅकमध्ये बंद होणे आवश्यक असते. जेणेकरून न्यायाधीन बंदी विनाकारण त्यांचे नियोजित कक्षातून इतरत्र फिरू नये यासाठी सुरक्षा व्यवस्था तसेच शिस्त न बिघडणेबाबत प्रशासन जागरूक असते.

जे न्यायाधीन बंदी व साधी शिक्षा असलेले बंदी स्वेच्छेने कारागृहातील काम करण्यास इच्छुक असतील, त्यांना कारागृह प्रशासन प्रोत्साहनपर मजुरी नियमानुसार देते. याबाबीसाठी कारागृह प्रशासन प्रयत्नशील असते.

## ४. कारागृहात बंद्यांसाठी निवास व्यवस्था

कारागृहातील सर्वसाधारण बंद्यांना रात्री बंद करण्यासाठी बॅरॅकची सोय असते. तसेच ज्या बंद्यांना जास्त सुरक्षा व्यवस्था द्यावी लागते अशा बंद्यांना सुरक्षित कक्षात ठेवण्याची तरतूद आहे. त्या बंद्यांना त्यांच्या विश्रामासाठी चांगल्यापैकी मोकळी जागा नियमाप्रमाणे उपलब्ध केली जाते.

संपूर्ण बॅरॅक्स्‌ची तसेच कारागृहाच्या आतील, बाहेरील परिसराची स्वच्छता कटाक्षाने राखली जाते. पिण्याच्या पाण्याचे हौद नेहमी स्वच्छ ठेवण्यात येतात. सर्व शौचालये, जलधौत (फ्लॅश टाईप) प्रकारात रूपांतरित करण्यात आले आहेत. प्रत्येक कारागृहात नवीन शौचालये बांधण्यात आली आहेत. कारागृहातील बॅरॅक्स्, विभक्त कोठड्या यांना वारंवार रंग सफेदी करण्यात येत. तसेच कारागृहातील सांडपाण्याच्या गटारी नेहमी स्वच्छ राहतील याची कारागृह प्रशासन कटाक्षाने काळजी घेते. बंद्यांना दैनंदिन पुरविले जाणारे अन्नधान्य व्यवस्थित साफ केले जाते. स्वयंपाकगृहातील काम करणाऱ्या बंद्यांचे स्वास्थ्य नेहमी चांगले असल्याबद्दल तसेच त्यांना कोणतेही त्वचारोग अगर आजार नसल्याबाबत वैद्यकीय अधिकाऱ्याकडून वारंवार तपासणी केली जाते. या सर्व बाबी राबविणेबाबत प्रशासनाचा मुख्य उद्देश बंद्यांचे आरोग्य, स्वास्थ्य चांगले राहावे असा आहे.

५. **कारागृहात बंद्यांना कपडे, बिस्तरा व इतर गरजेच्या वस्तू पुरविणे.**

* **सिद्धदोष बंद्यांना खाली नमूद केल्याप्रमाणे कपडे, बिस्तरा साहित्य व इतर गरजेच्या वस्तू देण्यात येतात.**
* **न्यायाधीन बंद्यांना त्यांचे खाजगी कपडे वापरता येतात. बिस्तरा व इतर गरजेच्या वस्तू देण्यात येतात.**

| अ. क्र. | वस्तू | पुरुष बंदी | महिला बंदी |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | सुती आणि लोकरची ब्लँकेट .. | १ | १ |
| २ | सुती चादर .. | १ | १ |
| ३ | सतरंजी .. | १ | १ |
| ४ | सुती सदरा .. | २ | -- |
| ५ | सुती व लोकरी जॅकेट (थंडीत) .. | १ | -- |
| ६ | विजारी .. | २ | -- |
| ७ | टोपी .. | १ | -- |
| ८ | सुती साड्या .. | -- | २ |
| ९ | सुती चोळ्या .. | -- | २ |
| १० | सुती पेटीकोट .. | -- | २ |
| ११ | डायपर .. | -- | ८ |
| १२ | उशी व उशी कव्हर .. | १ | १ |
| १३ | ॲल्युमिनियम मग .. | १ | १ |
| १४ | थाळी .. | १ | १ |
| १५ | वाटी .. | १ | १ |

६. कारागृहातील बंद्यांना देण्यात येणारा आहार.

* स्त्री व पुरुष भारतीय व परदेशी न्यायाधीन व सिद्धदोष बंद्यांना द्यावयाच्या आहाराचे सुधारित प्रमाण.--

| अ. क्र. | आहार वस्तू | परिमाण |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | तांदूळ (अ) न्यायाधीन बंदी .. | १५० ग्रॅम |
| | (ब) शिक्षा झालेल्या बंद्यास .. | २०० ग्रॅम |
| २ | गहू किंवा ज्वारी किंवा बाजरी किंवा मिश्र पीठ. | |
| | (अ) न्यायाधीन बंदी पुरुष (उपलब्धतेनुसार). | ३०० ग्रॅम पीठ किंवा ५०० ग्रॅम वजनाचा पाव. |
| | (ब) न्यायाधीन बंदी स्त्री | ३०० ग्रॅम पीठ किंवा ५०० ग्रॅम वजनाचा पाव. |
| | (क) शिक्षा बंदी पुरुष | ३५० ग्रॅम पीठ किंवा ६०० ग्रॅम वजनाचा पाव. |
| | (ड) शिक्षा बंदी स्त्री | २०० ग्रॅम पीठ किंवा ३५० ग्रॅम वजनाचा पाव. |
| ३ | कडधान्ये व डाळ .. | १२० ग्रॅम रविवार सोडून |
| ४ | भाजीपाला तीन दिवस (सोमवार, बुधवार, शुक्रवार). | |
| | (अ) पालेभाजी .. | १०० ग्रॅम |
| | (ब) इतर .. | ५० ग्रॅम |
| | (क) कंदमुळे .. | ५० ग्रॅम |

| अ. क्र. | वस्तू | | परिमाण |
|---|---|---|---|
| १ | २ | | ३ |
| | भाजीपाला चार दिवस (मंगळवार), गुरुवार, शनिवार, रविवार). | | |
| | (अ) इतर, (ब) कंदमुळे | .. | १०० ग्रॅम |
| ५ | दूध किंवा दही, टोमॅटो | .. | १०० ग्रॅम |
| ६ | बेसन पीठ | .. | ३० ग्रॅम फक्त रविवारसाठी |
| ७ | कांदे | .. | ५० ग्रॅम |
| ८ | गोडेतेल | .. | २० ग्रॅम |
| ९ | मीठ | .. | १० ग्रॅम |
| १० | केळी | .. | १ नग (१०० ग्रॅम) |
| ११ | ओला मसाला | .. | ५ ग्रॅम (हिरवी मिरची २ ग्रॅम, आले १.५ ग्रॅम, कोथिंबीर १ ग्रॅम, कढीपत्ता ०.५ ग्रॅम). |
| १२ | सुका मसाला | .. | १० ग्रॅम (जिरे ०.२५ ग्रॅम, हिंग ०.२५ ग्रॅम, हळद ०.५० ग्रॅम, लसूण ०.७५ ग्रॅम, धने ०.७५ ग्रॅम, मेथी ०.७५ ग्रॅम, मोहरी ०.७५ ग्रॅम, मिरची ६ ग्रॅम). |
| १३ | जळण | .. | ६८० ग्रॅम लाकूड किंवा १०० मि. लि. डिझेल. |

* **खुले कारागृहातील बंद्यांना द्यावयाच्या आहाराचे सुधारित प्रमाण.--**

| अ. क्र. | आहार वस्तू | परिमाण |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | तांदूळ .. | १५० ग्रॅम |
| २ | गहू किंवा ज्वारी किंवा बाजरी किंवा मिलो पीठ (उपलब्धतेनुसार). | ५५० ग्रॅम पीठ किंवा २५० ग्रॅम वजनाचा पाव (गरोदर स्त्रियांसाठी). १५० ग्रॅम पीठ किंवा २५० ग्रॅम वजनाचा पाव (स्तनदा महिला). |
| ३ | कडधान्ये व डाळी .. | १२० ग्रॅम रविवार सोडून |
| ४ | भाजीपाला तीन दिवस (सोमवार, बुधवार, शुक्रवार). | |
| | (अ) पालेभाजी .. | १०० ग्रॅम |
| | (ब) इतर .. | ५० ग्रॅम |
| | (क) कंदमुळे .. | ५० ग्रॅम |
| | भाजीपाला चार दिवस (मंगळवार, गुरुवार, शनिवार, रविवार). | |
| | (अ) इतर .. | १०० ग्रॅम |
| | (ब) कंदमुळे .. | १०० ग्रॅम |
| ५ | दूध किंवा दही .. | १०० मि. लि. |
| ६ | बेसन पीठ .. | ३० ग्रॅम |
| ७ | कांदे .. | ५५ ग्रॅम |
| ८ | गोडेतेल .. | २० ग्रॅम |
| ९ | मीठ .. | १० ग्रॅम |

| अ. क्र. | आहार वस्तू | | परिमाण |
|---|---|---|---|
| १ | २ | | ३ |
| १० | चिंच | .. | ५ ग्रॅम |
| ११ | केळी | .. | १ नग (१०० ग्रॅम) |
| १२ | ओला मसाला | .. | ५ ग्रॅम (हिरवी मिरची २ ग्रॅम, आले १.५ ग्रॅम, कोथिंबीर १ ग्रॅम, कढीपत्ता ०.५ ग्रॅम). |
| १३ | सुका मसाला | .. | १० ग्रॅम (जिरे ०.२५ ग्रॅम, हिंग ०.२५ ग्रॅम, हळद ०.५० ग्रॅम, लसूण ०.७५ ग्रॅम, धने ०.७५ ग्रॅम, मेथी ०.७५ ग्रॅम, मोहरी ०.७५ ग्रॅम, मिरची ६ ग्रॅम). |
| १४ | जळण | .. | ६८० ग्रॅम लाकूड किंवा १०० मि. लि. डिझेल. |

* **वैद्यकीय आहार सुधारित प्रमाण.--**

| अ. क्र. | आहार वस्तू | परिमाण |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | पर्याय-अ | |
| | (अ) दूध | .. १३०० मि. लि. |
| | (ब) साखर | .. २५ ग्रॅम |
| | (क) जळण | .. ४५० ग्रॅम लाकूड किंवा ७० मि. लि. डिझेल. |
| २ | पर्याय-ब | |
| | (अ) दूध | .. ८८० मि. लि. |
| | (ब) साबुदाणा | .. ८५ ग्रॅम |
| | (क) साखर | .. ५५ ग्रॅम |
| | (ड) तांदूळ | .. ५५ ग्रॅम |
| | (इ) मीठ | .. ५ ग्रॅम |
| | (फ) जळण | .. ४५० ग्रॅम लाकूड किंवा ७० मि. लि. डिझेल. |
| ३ | पर्याय-क | |
| | (अ) साधा आहार (आहार प्रमाण क्रमांक १). | |
| | (ब) दूध | .. २०० मि. लि. |

* **गरोदर महिला यांना द्यावयाच्या आहाराचे सुधारित प्रमाण.--**

| अ. क्र. | आहार वस्तू | परिमाण |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | तांदूळ | .. १५० ग्रॅम |
| २ | गहू, ज्वारी, बाजरी, मिलो पीठ (उपलब्धतेनुसार). | १५० ग्रॅम पीठ किंवा २५० ग्रॅम वजनाचा पाव. |
| ३ | कडधान्ये व डाळी | .. १२० ग्रॅम |
| ४ | भाजीपाला तीन दिवस (सोमवार, बुधवार, शुक्रवार). | |
| | (अ) पालेभाजी | .. १०० ग्रॅम |
| | (ब) इतर | .. ५० ग्रॅम |
| | (क) कंदमुळे | .. ५० ग्रॅम |
| | भाजीपाला चार दिवस (मंगळवार, गुरुवार, शनिवार, रविवार). | |
| | (अ) इतर | .. १०० ग्रॅम |
| | (ब) कंदमुळे | .. १०० ग्रॅम |
| ५ | बेसन पीठ | .. ३० ग्रॅम |
| ६ | कांदे | .. ५० ग्रॅम |
| ७ | टोमॅटो | .. १०० ग्रॅम |
| ८ | गोडेतेल | .. २० ग्रॅम |
| ९ | मीठ | .. १० ग्रॅम |
| १० | केळी | .. १ नग (१०० ग्रॅम) |

| अ. क्र. | आहार वस्तू | | परिमाण |
|---|---|---|---|
| १ | २ | | ३ |
| ११ | ओला मसाला | .. | ५ ग्रॅम (हिरवी मिरची २ ग्रॅम, आले १.५ ग्रॅम, कोथींबीर १ ग्रॅम, कढीपत्ता ०.५ ग्रॅम). |
| १२ | सुका मसाला | .. | १० ग्रॅम (जिरे ०.२५ ग्रॅम, हिंग ०.२५ ग्रॅम, हळद ०.५० ग्रॅम, लसूण ०.७५ ग्रॅम, धने ०.७५ ग्रॅम, मेथी ०.७५ ग्रॅम, मोहरी ०.७५ ग्रॅम, मिरची ६ ग्रॅम). |
| १३ | शेंगदाणे | .. | ५० ग्रॅम |
| १४ | गुळ | .. | २५ ग्रॅम |
| १५ | दूध | .. | १५० मि. ली. |
| १६ | जळण | .. | ६८० ग्रॅम लाकूड किंवा १०० मि. लि. डिझेल. |

* **मुलांसाठी आहार.--**

| अ. क्र. | आहार | मूल ६-१२ महिने (एकक) | मूल १ ते ३ वर्ष (एकक) | मूल ४ ते ६ वर्ष (एकक) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | धान्य किंवा ज्वारी, बाजरी यापासून तयार केलेले लहान मुलांसाठीचे खाद्य (सिरियल्स व मिलेटस) | ४५ ग्रॅम | ६०-१२० ग्रॅम | १५०-२१० ग्रॅम |
| २ | पल्सेस व डाळी, अख्ख्ये वाटाणे, चवळी, तुरी यांचे दाणे. | १५ ग्रॅम | ३० ग्रॅम | ४५ ग्रॅम |
| ३ | दूध .. | स्तनपान करणाऱ्या मुलांसाठी २०० मि. ली. | ५०० मि. ली. | ५०० मि. ली. |
| ४ | कंदमूळ (रुट्स व ट्युबर्स). | ५० ग्रॅम | ५० ग्रॅम | १०० ग्रॅम |
| ५ | हिरव्या पालेभाज्या .. | २५ ग्रॅम | ५० ग्रॅम | ५० ग्रॅम |
| ६ | अन्य भाज्या .. | २५ ग्रॅम | ५० ग्रॅम | ५० ग्रॅम |
| ७ | फळे .. | १०० ग्रॅम | १०० ग्रॅम | १०० ग्रॅम |
| ८ | साखर .. | २५ ग्रॅम | २५ ग्रॅम | ३० ग्रॅम |
| ९ | खाद्यतेल .. | १० ग्रॅम | २० ग्रॅम | २५ ग्रॅम |

* **मुलांसाठी आहार.--**

| अ. क्र. | आहार | | मूल<br>६-१२ महिने<br>(एकक) | मूल<br>१ ते ३ वर्ष<br>(एकक) | मूल<br>४ ते ६ वर्ष<br>(एकक) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ |
| १० | (कडधान्य व डाळींच्या ऐवजी) अंडी/मांस कोंबडीचे मांस/मासे. | | ५० ग्रॅम | ५० ग्रॅम | ५० ग्रॅम |
| ११ | कांदे | .. | २५ ग्रॅम | २५ ग्रॅम | २५ ग्रॅम |
| १२ | टोमॅटो | .. | २५ ग्रॅम | २५ ग्रॅम | २५ ग्रॅम |
| १३ | केळी | .. | १ नग १०० ग्रॅम | १ नग १०० ग्रॅम | १ नग १०० ग्रॅम |
| १४ | शेंगदाणे | .. | २५ ग्रॅम | २५ ग्रॅम | २५ ग्रॅम |
| १५ | गुळ | .. | २५ ग्रॅम | २५ ग्रॅम | २५ ग्रॅम |
| १६ | मीठ | .. | ५ ग्रॅम | ५ ग्रॅम | ५ ग्रॅम |
| १७ | जळण | .. | ४५० ग्रॅम लाकूड किंवा ७० मि. लि. डिझेल. | ४५० ग्रॅम लाकूड किंवा ७० मि. लि. डिझेल. | ४५० ग्रॅम लाकूड किंवा ७० मि. लि. डिझेल. |

परंतु सहा महिन्यांपेक्षा लहान वयाच्या मुलाला अंगावरचे दूध उपलब्ध नसल्यास पाणी न मिसळलेले ६०० मि. लि. पेक्षा कमी नसेल इतके ताजे दूध दिवसभरासाठी पुरविण्यात येईल.

**आधार.**--शासन अधिसूचना क्रमांक जेएलएम-१००६/प्र. क्र. २४८/पीआरएस-२, दिनांक ७ फेब्रुवारी २००७.

* **किशोर [BOSTAL LADS] यांना द्यावयाच्या आहाराचे सुधारित प्रमाण.--**

| अ. क्र. | आहार वस्तू | | परिमाण |
|---|---|---|---|
| १ | २ | | ३ |
| १ | तांदूळ | .. | १३० ग्रॅम |
| २ | गहू, ज्वारी, बाजरी, मिलो पीठ (उपलब्धतेनुसार). | | ६०० ग्रॅम पीठ किंवा १,००० ग्रॅम वजनाचा पाव. |
| ३ | कडधान्य व डाळी | .. | १०० ग्रॅम |
| ४ | भाजीपाला तीन दिवस (सोमवार, बुधवार, शुक्रवार). | | |
| | (अ) पालेभाजी | .. | १०० ग्रॅम |
| | (ब) इतर | .. | ५० ग्रॅम |
| | (क) कंदमुळे | .. | ५० ग्रॅम |
| | भाजीपाला चार दिवस (मंगळवार, गुरुवार, शनिवार, रविवार). | | |
| | (अ) इतर | .. | १०० ग्रॅम |
| | (ब) कंदमुळे | .. | १०० ग्रॅम |
| ५ | बेसन पीठ | .. | ३० ग्रॅम फक्त रविवारसाठी |
| ६ | कांदे | .. | ५५ ग्रॅम |
| ७ | गोडेतेल | .. | ४० ग्रॅम |
| ८ | मीठ | .. | १० ग्रॅम |
| ९ | केळी | .. | १ नग (१०० ग्रॅम) |

| अ. क्र. | वस्तु | परिमाण |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १० | ओला मसाला | .. ५ ग्रॅम (हिरवी मिरची २ ग्रॅम, आले १.५ ग्रॅम, कोथिंबीर १ ग्रॅम, कढीपत्ता ०.५ ग्रॅम) |
| ११ | सुका मसाला | .. १० ग्रॅम (जिरे ०.२५ ग्रॅम, हिंग ०.२५ ग्रॅम, हळद ०.५० ग्रॅम, लसूण ०.७५ ग्रॅम, धणे ०.७५ ग्रॅम, मेथी ०.७५ ग्रॅम, मोहरी ०.७५ ग्रॅम, मिरची ६ ग्रॅम). |
| १२ | चिंच | .. ५ ग्रॅम |
| १३ | शेंगदाणे | .. ७५ ग्रॅम |
| १४ | गुळ | .. ५५ ग्रॅम |
| १५ | दूध | .. २५० मि. लि. |
| १६ | जळण | .. ६८० ग्रॅम लाकूड किंवा १०० मि. लि. डिझेल. |

* **बंद्यांना देण्यात येणाऱ्या चहा व न्याहारीचे प्रमाण :--**

| अ. क्र. | पदार्थ | परिमाण |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| **(अ) चहा** | | |
| १ | साखर | .. २० ग्रॅम |
| २ | चहा पावडर | .. ५ ग्रॅम |
| ३ | दूध | .. ५० मि. ली. |
| **(ब) शिरा (रविवारी व गुरुवारी)** | | |
| १ | रवा | .. ६० ग्रॅम |
| २ | गुळ | .. ४० ग्रॅम |
| ३ | वनस्पती तूप | .. २० ग्रॅम |
| **(क) उपीट किंवा पोहे** | | |
| १ | पोहे | .. ६० ग्रॅम (मंगळवार, शुक्रवार) |
| २ | रवा | .. ६० ग्रॅम (सोमवार, बुधवार, शनिवार) |
| ३ | कांदे | .. १० ग्रॅम |
| ४ | गोडेतेल | .. ५ ग्रॅम |
| ५ | राई (मोहरी) | .. ०.५ ग्रॅम |
| ६ | कोथिंबीर | .. १ ग्रॅम |
| ७ | हिरवी मिरची | .. २ ग्रॅम |
| ८ | हळद | .. ०.५ ग्रॅम |
| ९ | मीठ | .. २ ग्रॅम |

(१. इंधन-अ, ब आणि क करिता १२० ग्रॅम लाकूड किंवा २५ मि. लि. डिझेल वापरले जाते. धार्मिक सणादिवशी बंद्यांना शिरा देण्यात येतो).

न्यायाधीन बंद्यांचा आहार, सिद्धदोष बंद्यांचा आहार, खुल्या कारागृहातील बंद्यांचा आहार, वैद्यकीय आहार, गरोदर स्त्रियांचा आहार, किशोरांचा आहार. बंद्यांना देण्यात येणारा चहा व न्याहारी हे शासन अधिसूचना क्रमांक एमआयएस- २००४/प्र. क्र. ४७/ पीआरएस-२, दिनांक २७ मे, २००५ प्रमाणे मंजूर करण्यात आला आहे).

## ७. कारागृहामध्ये बंद्यांसाठी असलेली वैद्यकीय सुविधा

राज्यात मध्यवर्ती कारागृहे, जिल्हा कारागृहे तसेच खुली कारागृहे असा एकूण विस्तार आहे. कारागृहाच्या बंदी क्षमतेवर वैद्यकीय व्यवस्था प्रशासनाकडून अस्तित्वात आहे. मध्यवर्ती कारागृहात बंदी संख्या जास्त असल्यामुळे कारागृहातच आंतररुग्ण ठेवण्याची व्यवस्थाही आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी, मिश्रक, परिचारक यांचीही नेमणूक केलेली आहे. दैनंदिन किरकोळ आजारावर देण्यासाठी औषधांचा साठा पुरेसा असतो. जास्त आजारी बंदी रुग्णांना विशेष उपचारासाठी स्थानिक शासकीय सर्वोपचार रुग्णालयात पाठविण्यात येते. मुंबईला जे. जे. समूह रुग्णालयात कारागृह बंद्यांसाठी अगदी वेगळी व्यवस्था आहे.

या व्यतिरिक्त स्थानिक सर्वोपचार रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधून बंद्यांसाठी डोळे तपासणी शिबिर, दंत चिकित्सा शिबिर व तत्सम बाबी कारागृहात राबविण्यात येतात. तसेच लायन्स क्लब, रोटरी क्लब अशा सेवाभावी संस्थांकडून बंद्यांना डोळे तपासून मोफत चष्मे वाटपाचे शिबिरही आयोजित करण्याचा उपक्रम राबविण्यात येतो.

कारागृहात महारोग, इतर त्वचारोग, क्षयरोग आणि एडस् व कावीळ अशा संसर्गजन्य रोगाने पीडित रुग्णांना विभक्त ठेवण्याची प्रशासनाकडून खबरदारी घेण्यात येते. कारण कारागृहातील इतर बंद्यांचे सर्वसामान्य स्वास्थ्य अबाधित ठेवणे महत्त्वाचे असते तसेच मनोरुग्ण बंदी त्यांच्यासाठी वेगळ्या कक्षाची सोय असते. शिक्षा लागलेला बंदी मनोरुग्ण झाल्यावर त्याला नजीकच्या मनोरुग्णालयात पाठविण्याची नियमात तरतूद आहे. तसेच न्यायाधीन बंदी मनोरुग्ण आढळल्यास न्यायालयाचे आदेशाने नजीकच्या मनोरुग्णालयात पाठविण्याची तरतूद आहे. त्यानुसार कार्यवाही केली जाते.

स्त्री बंदी रुग्णांना तपासणीसाठी स्त्री वैद्यकीय अधिकाऱ्यांची सोय असते. इतर कारागृहात नजीकच्या शासकीय रुग्णालयातून स्त्री वैद्यकीय अधिकारी वेळोवेळी भेट देऊन स्त्री बंद्यांची वैद्यकीय तपासणी व औषधोपचार उपाययोजना करतात व आवश्यक वाटल्यास नजीकच्या शासकीय रुग्णालयात पाठविण्यात येते.

ज्या बंद्यांना विशेष आहाराची गरज आहे अशा रुग्ण बंद्यांना वैद्यकीय अधिकारी यांनी शिफारस केलेले पौष्टिक आहार देण्याची सुविधा आहे. तसेच वयस्कर बंद्यांना पोळी अगर भाकरी खात येता नसेल अशांना भात देण्याची तरतूद आहे. ज्या बंद्यांना तिखट किंवा तेल तूप वर्ज्य असेल अशा बंद्यांना या वस्तूचा वापर न करता अन्न तयार करून दिले जाते.

सामान्य स्वास्थ्य ठेवण्यासाठी बंद्यांचे केस कापणे, दाढी करणे, तसेच आठवड्यातून अंथरूण-पांघरूण व कपडे धुण्यासाठी खर्च शासन करते.

## ८. वैयक्तिक स्वच्छतेसाठी खालीलप्रमाणे सवलती देण्यात येत आहेत

| अ. क्र. | वस्तू | पुरुष बंदी | महिला बंदी | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | दंत मंजन .. | ५० ग्रॅम | ५० ग्रॅम | महिन्यातून एकदा |
| २ | आंघोळीचा साबण | ११३ ग्रॅम | ११३ ग्रॅम | महिन्यातून एकदा |
| ३ | खोबरेल तेल .. | १४ ग्रॅम | १४ ग्रॅम | आठवड्यातून एकदा |
| ४ | खोबरेल तेल .. | २८ ग्रॅम | २८ ग्रॅम | वॉर्डर व वॉचमन महिला शि[illegible]... |
| ५ | खोबरेल तेल .. | -- | २८ ग्रॅम | लहान मुले |
| ६ | कॉर्बोलिक सोप.. | ५८ ग्रॅम | ५८ ग्रॅम | महिन्यातून एकदा कुंडा काम करणारे बंदी व लहान मुले. |

## ९. बंद्यांचे शास्त्रीय वर्गीकरण

बंद्यांचे त्याच्या एकूण गरजेप्रमाणे कारागृहातील उपचार वेळोवेळी त्यांच्या एकूण कलाने समन्वित करून राबविणे किंवा हा समन्वय साधताना बंद्यांचे मानसिक निदान, उपचार लक्षात घेऊन वर्गीकरण समितीमार्फत प्रशासनाचा कार्यक्रम याला शासकीय वर्गीकरण म्हणतात. या प्रक्रियेत बंद्यांना कामाचे वाटप तसेच त्यांचा मानसिक अभ्यास इत्यादी बाबींचा समावेश आहे व त्याप्रमाणे कारागृह प्रशासन त्यांच्या वेळोवेळीच्या गरजा लक्षात घेऊन कार्यक्रम आखते.

वेळोवेळी बंद्यांचे पुनर्विलोकन या एकंदरीत प्रक्रियेत समाविष्ट असते. या एकूण प्रक्रियेचा उद्देश बंद्यांना त्यांचे गरजेनुसार प्रयोजन केल्यामुळे बंद्यास कारागृहीन जीवनात तसेच तो कारागृहातून सुटल्यावर त्याचा परिणामकारक उपयोग होईल असा आहे.

## १०. बंद्यांसाठी भेटीची सवलत

कारागृहातील बंदी हा आपल्या नातेवाईकांपासून दूर असल्यामुळे त्याला त्यांना भेटण्याबाबत नियमात तरतूद आहे. जेणेकरून त्यांचे नातेवाईक व इतरांशी संबंध अबाधित राहतात तसेच दैनंदिन घरातील अडचणी व इतर बाबींची चर्चा होण्यास मदत होते. नियमाप्रमाणे काही विशेष प्रसंगी जादा भेटी देणेबाबत प्रचलित नियमात तरतूद आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायाधीन बंदी .. | आठवड्यातून एक वेळा .. | वकिलांना न्यायालयीन व कायदे विषयक सल्ला देण्यासाठी प्रशासनिक सोयीनुसार केव्हाही भेटता येते, कारागृहीन सुट्टीचा दिवस वगळता. |
| स्थानबद्ध .. | आठवड्यातून दोन वेळा .. | |
| सिद्धदोष बंदी .. | महिन्यातून एक वेळा .. | |

नियमाप्रमाणे काही विशेष प्रसंगी जादा भेटी देण्याबाबत प्रचलित नियमात तरतूद आहे.

एका वेळी ५ कुटुंबीय व्यक्ती किंवा दोन मित्र यांना भेट घेता येते.

निरनिराळ्या गँगच्या व महत्त्वाच्या केसमधील बंद्यांना प्रशासकीय सुरक्षाव्यवस्था म्हणून या संवर्गातील बंद्यांना भेटीसाठी येणाऱ्या व्यक्ती फक्त नातेवाईकच असल्यास आणि ते नातेवाईक असल्याबाबत नजीकच्या पोलीस स्टेशनकडून दाखला आणणेबाबत प्रशासनाची मागणी असते.

तसेच भेटीच्या वेळी कौटुंबिक बाबी, खाजगी चर्चा व कोर्टकेसबाबत चर्चा करण्यास परवानगी आहे. तो या संवर्गातील बंद्यांनी कटाक्षाने पाळावा अशी प्रशासनाची अपेक्षा आहे.

नातेवाईक भेटी व वकील भेटी ह्यांच्या वेळा अधीक्षक ठरवितात. बंद्यांना कारागृहात दाखल झाल्यावर भेटीसाठी नातेवाईकांची नावे कारागृह अधिकाऱ्यांकडे देणे अनिवार्य आहे. साधाणत: भेट ही २० मिनिटींत आटोपणे अनिवार्य आहे. भेटीच्या वेळी कोणत्याही वस्तू देवाण-घेवाण निषिद्ध आहे. सदरच्या सर्व भेटी या **नि:शुल्क** असतात.

## ११. पत्रव्यवहार

बंद्याने नातेवाईकांशी, मित्राशी, वकिलांशी पत्र व्यवहार करण्याची तरतूद आहे. नियमावलीप्रमाणे बंद्यांच्या येणाऱ्या व जाणाऱ्या पत्रांची छाननी केली जाते. बंद्याने कोणास पत्र पाठविणार याबाबतची यादी देणे आवश्यक असते. कारण बंद्याने महिन्यातून दोन पत्रे (एक स्वखर्चाने व एक शासकीय खर्चाने) पाठविण्याबाबत सवलत आहे. येणाऱ्या व जाणाऱ्या पत्रांचा मजकूर हा कारागृह अधिकारी यांना समजेल असा असावा. तसेच येणाऱ्या व जाणाऱ्या पत्रातील मजकूर खाजगी किंवा वैयक्तिक अडीअडचणीबाबतचा असावा. वेळ पडल्यास व कारण सयुक्तिक असल्यास जादा पत्र स्वत:च्या खर्चाने पाठविण्याची परवानगी दिली जाते. येणाऱ्या पत्राबाबत किती पत्रे यावीत यावर बंधन नसते. प्रसंगी बंद्यास तार अगर रजिस्टर पोस्टाने देखील पत्रव्यवहाराची सोय असते. येणाऱ्या-जाणाऱ्या पत्रातील मजकूर जर संशयास्पद, आक्षेपार्ह असल्याचे दिसून आले तर सुरक्षा कारणास्तव असा पत्रव्यवहार थोपवून धरण्यात येतो व त्याची माहिती संबंधित बंद्यास सांगितली जाते.

## १२. वर्तमानपत्रे

बंद्यांना मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू व तत्सम भाषिक शासन मान्य यादीतील वर्तमानपत्रे २० बंद्यांकरिता एक नग याप्रमाणात शासन खर्चाने पुरविण्यात येतात. बंद्यांना त्या त्या विषयातील पुस्तके ठेवण्याची मुभा दिली जाते. तसेच न्यायाधीन बंद्यांना त्यांची इच्छा असल्यास त्यांच्या खाजगी रकमेतून शासनमान्य वर्तमानपत्रे खरेदी करता येतात.

## १३. कायदेविषयक मदत

(अ) बंद्याना कारागृहामार्फत उच्च/सर्वोच्च न्यायालयात अपील करावयाचे असल्यास त्यांना पूर्ण सहकार्य व मदत प्रशासनाकडून दिली जाते महाराष्ट्र शासनाने आता महाराष्ट्र राज्य, (तुरुंग आणि बाल सुधारगृह यांना भेट) प्रकरण नियम १९९३ केले आहेत. या नियमानुसार कार्यसमुपदेशक (Duty Counsels) यांची नेमणूक करणेत आली असून त्यांचेमार्फत कायदेविषयक सल्ला व साहाय्य मिळवून देण्याचा उद्देश आहे. याद्वारे सर्व न्यायाधीन बंदी यांना कार्यसमुपदेशन यांचेकडून साहाय्य मिळणेसाठी बंद्यांचे अर्ज त्यांचेकडे पाठविण्यात येतात व प्रोत्साहन देण्यात येते.

(ब) ज्या बंद्यांना अपिलांसाठी व केससाठी स्वतःचा वकील नेमणे शक्य नसेल, अशा बंद्यांना शासनातर्फे वकील देण्याची तरतूद आहे.

(क) बंदी कारागृहात आल्यामुळे त्याचे आर्थिक व्यवहार चालू ठेवणेबाबत त्याला त्याच्या इच्छुक व्यक्तीला पॉवर ऑफ ॲटर्नी (मुखत्यार) पत्र करून देण्याची तरतूद आहे.

(ड) बंद्याला इच्छापत्र करून ठेवता येते.

(ई) बंद्यांना पुढील शिक्षणासाठी सर्वोतोपरी प्रोत्साहन देऊन मदत केली जाते व तसे प्रशिक्षण वर्ग चालविले जातात व सर्व सोईसुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.

## १४. वेतनपद्धत व आर्थिक व्यवहार

कारागृहातील बंद्यांना देण्यात येणाऱ्या वेतन पद्धतीचा प्रमुख उद्देश म्हणजे बंद्याच्या मनात स्वावलंबनाची भावना जागृत करून शासनास काही प्रमाणात का होईना महसूल मिळवून देणे हा आहे. २५ नोव्हेंबर १९९९ पासून शासनाने वेतनाचे दरात सुधारणा केली असून त्यात पुढील दराने वेतन देय केले आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कुशल कामगार | .. | रुपये २५.५० |
| २. | अर्ध कुशल | .. | रुपये १७.०० |
| ३. | अकुशल | .. | रुपये १२.७५ |

दैनंदिन गरजा भागविण्यासाठी त्यातील १/१० रक्कम नावावर शिल्लक ठेवून उर्वरित रक्कम दिलेल्या कुपन्सच्या माध्यमातून खर्च करता येते. या खर्चात उपाहारगृहातील वस्तू खरेदी करणे तसेच जवळच्या नातेवाईकांना तसेच त्यांच्या न्यायालयीन कामासाठी वकिलांना मनिऑर्डरने पैसे पाठविण्याची सुविधा आहे. न्यायाधीन बंद्यांना स्वेच्छेने काम केल्यास प्रोत्साहनपर वेतन दिले जाते. बंद्यांची १/१० राखून ठेवलेली रक्कम (बचत) त्यास कारागृहातून मुक्त होतेवेळी दिली जाते. बंद्यास कारागृहातून सुटताना त्याच्या नावावर जमा असलेली संपूर्ण रक्कम परत केली जाते. जेणेकरून कारागृहातून मुक्त झाल्यावर त्याला लगेच इतरांकडून मदत घेण्याची गरज पडू नये असा त्यामागे उद्देश आहे.

## १५. बंद्यांसाठी उपाहारगृह

कारागृहातील बंद्यांसाठी दैनंदिन आहाराव्यतिरिक्त कारागृहात उपाहारगृहाची व्यवस्था नियमानुसार केलली आहे. ही उपाहारगृहे **ना नफा ना तोटा** या तत्त्वावर चालविली जातात. या उपाहारगृहातून बंद्यासाठी कूपन्सद्वारे साधारणत: खालील नमूद वस्तू विक्रीसाठी ठेवण्यात येतात. प्रत्येक बंद्यास त्याचे वेतन व खाजगी रकमेतून जास्तीत जास्त १,५०० कूपन्स दिले जातात. कूपन्स ही अहस्तांतरणीय असतात.

(अ) चहा, कॉफी, दूध.

(ब) लोणची, ब्रेड, बिस्किटे, चॉकलेट, अंडी, साखर, शेंगदाणे, गूळ.

(क) बिडी-सिगारेट, तंबाखू.

(इ) साबण, तेल, कंगवे, इत्यादी.

(फ) टूथपेस्ट, टूथ पावडर, ब्रश.

(ग) कागद पेन्सिल, पेन बॉलपेन, नोट-बुक्स इत्यादी लिखाणाच्या वस्तू.

(च) पोस्टकार्ड, लिफाफे, आंतरदेशीय पत्रे, तिकीटे.

(च) उपाहारगृहातून बंद्याच्या खाद्योपयोगी पदार्थ मागणीनुसार व सणानुसार नियमात बसत असलेल्या वस्तूच तयार करून विकल्या जातात.

## १६. बंद्यासाठी खेळ व करमणूक

बंद्यांना साधारणतः त्यांच्या कामावरून परत आल्यावर करमणूक म्हणून व्हॉलिबॉल, कबड्डी असे खेळ खेळण्यासाठी नियमात तरतूद आहे. मैदानी खेळामुळे बंद्याचे आरोग्य, त्यांच्या मनाची प्रसन्नता तसेच सांघिक व सहकार्याची भावना उत्पन्न होऊन त्यांच्या एकूण वागण्यात फरक पडावा हा उद्देश असतो. बंद्यांना इनडोअर गेम्स जसे की बुद्धिबळ, कॅरम इत्यादी सुविधा पुरविली जाते. बंद्यास कारागृहाच्या आत किंवा व चांगल्या वर्तणुकीच्या बंद्यांना बाहेर स्पर्धेसाठी कारागृह महानिरीक्षक यांचे परवानगीने पाठविण्याची सोय आहे.

बंद्यांना करमणुकीसाठी कारागृहात दूरदर्शन संच, रेडिओची व्यवस्था शासनातर्फे करण्यात येते तसेच बंद्यांना कारागृहात स्त्रीपात्र विरहित नाटक व इतर विविध गुणदर्शन कार्यक्रम करण्याची परवानगी असते.

## १७. बंद्यांसाठी सण व उत्सवाचे आयोजन

कारागृहात बंद्यांना समाजापासून वंचित असल्याने वावगेपणा वाटू नये या उद्देशाने त्यांच्यासाठी रक्षाबंधन, गणेशोत्सव, दिवाळी, नाताळ, रमजान ईद तसेच १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, १ मे असे सण कारागृहात पाळले जातात. २ ऑक्टोबर **गांधी जयंती हा बंदी कल्याण दिन** म्हणून साजरा करण्यात येतो.

या सणांच्या दिवशी कारागृह उपाहारगृहात बंद्यांसाठी निरनिराळे खाद्यपदार्थ विक्रीला ठेवले जातात तसेच राष्ट्रीय सणाच्या दिवशी शासनातर्फे बंद्यांना मिष्टान्न व जास्तीचे जेवण पुरविले जाते. या सर्वांचा एकंदरित उद्देश बंद्यास आपणही समाजातच वावरत आहोत, असे वाटावे हा आहे.

## १८. शैक्षणिक कार्यक्रम

कारागृहात बंद्यांसाठी ग्रंथालय असते तसेच बंद्यांना त्याच्या खाजगी रकमेतून वर्तमानपत्रे दिली जातात. शासन खर्चाने कारागृहात शिक्षकांची सोय असते. निरक्षर बंद्यांना साक्षर करणेबाबत सतत प्रयत्न चालू असतात. त्यासाठी कारागृहामध्ये कायम स्वरूपी शिक्षकाची नेमणूक असते. तसेच साक्षर बंद्यांना उच्च शिक्षणासाठी कारागृह प्रशासनाची प्रोत्साहनपर सर्वांगीण मदत असते. अशी अनेक उदाहरणे आहेत की, कारागृहात बंद्याने कला विषयात स्नातक, स्नातकेतर तसेच कायदा विषयात स्नातकाची पदवी प्राप्त घेतली आहे. काही कारागृहात शासनातर्फे तर काही कारागृहात सेवाभावी संस्थामार्फत संगणकाचे प्रशिक्षण देण्याचे कार्य सुरू झालेले आहे. परीक्षेला बसण्यासाठी विशेष सवलत, अभिवचन रजा शासनातर्फे दिलेली आहे. या सर्व उपक्रमांमागे बंद्यांचे पुढील आयुष्य सुखाचे जावे असा कारागृह प्रशासनाचा उद्देश असतो.

या संदर्भात उदाहरण द्यावयाचे झाल्यास, येरवडा मध्यवर्ती कारागृहातील अफ्रिकन बंदी हॅरिसन कुडजो यांच्या कवितेला अमेरिकन शासनाने पुरस्कृत केले आहे. तसेच नागपूर मध्यवर्ती कारागृह येथील बंदी गणेश श्रावण चौधरी यास त्याच्या **"तृषार्त"** या **कविता संग्रहाबद्दल** महाराष्ट्र शासनाने पुरस्कृत केले आहे. बंदी हा कारागृहात सुखाने व समाधानाने राहत असून आपल्या जवळील कलागुणांचा विकास करू शकतो हे या वरील दोन्ही उदाहणांवरून दिसून येईल.

कारागृहात विपश्यना शिबिरासारखे विधायक कार्यक्रम राबविले जातात. बंद्यांचे आरोग्य अबाधित ठेवणे कामी योगासने वर्ग, जीवन जगण्याची कला यासारखे कार्यक्रम देखील घेतले जातात. बंद्यांच्या मनावरील ताण-तणाव कमी करण्यासाठी हास्य क्लब चालविले जातात.

तसेच नागरी जीवनाची ओळख, ग्रामपंचायती सामूहिक विकास योजना, पंचवार्षिक योजना, कुटीरोद्योग इत्यादी विविध विषयांवर त्या त्या विषयातील तज्ज्ञांकडून भाषणे आयोजित केली जातात. तसेच नीती-शिक्षणाचे पाठही आयोजित केले जातात.

## १९. औद्योगिक प्रशिक्षण शाळा

कारागृहात बंदी पुनर्वसनाच्या दृष्टीने निरनिराळी कामे उदाहरणार्थ शिवणकाम, लोहारकाम, सुतारकाम, चर्मोद्योग, विणकाम, साबण निर्मिती, बेकरी, कागद कारखाना, ऑटोमोबाईल वर्कशॉप, पेंटिंग विभाग, शेती हे उद्योग चालविले जातात. बंद्यांना त्याचे प्रशिक्षण मिळावे यासाठी कारागृहात औद्योगिक प्रशिक्षण शाळा सतत कार्यरत आहेत.

हे प्रशिक्षण देण्यासाठी तांत्रिक कर्मचाऱ्याची नेमणूक केलेली आहे ते कर्मचारी बंद्यांना त्या त्या उद्योगातील प्रशिक्षण देतात. या सर्व उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे बंद्यांचे सुटल्यानंतर योग्य पुनर्वसन व्हावे, तसेच त्यांचा कारावासातील काळ कामात व्यस्त राहून त्यांना पगार मिळून त्यांना त्यातून दैनंदिन खर्च भागविता यावा. तसेच बंद्यांच्या मनात शासनाचे काम केल्याबद्दल स्वाभिमान व आनंद वाटावा असा आहे.

## २०. माफी पद्धत

बंद्यांना माणूस समजणे हा कारागृह प्रशासनाचा दृष्टिकोन आहे. त्यांना त्याची जाणीव होणेकामी माफी पद्धतीची सवलत आहे.

| | | |
|---|---|---|
| साधारण माफी | .. | ७ दिवस |
| रात्र पहारेकरी (नाईट वॉचमन) | .. | ८ दिवस |
| सिद्धदोष अन्वेषक (वॉर्डर) | .. | ९ दिवस |
| कुंडाकाम | .. | १० दिवस |
| एक वर्ष झाल्यानंतर चांगल्या वर्तणुकीची माफी. | | ३० दिवस |

| | | |
|---|---|---|
| खुल्या कारागृहातील माफी | .. | एक महिन्याला ३० दिवस |
| खुली वसाहत माफी | .. | एक महिन्याला ३० दिवस |

बंद्यांना चांगले काम व वर्तणुकीबद्दल विशेष माफी दिली जाते. खुल्या कारागृहात व खुल्या वसाहतीतील बंद्यांना जास्त माफीची सवलत असते. तसेच शासनाकडून देखील काही विशेष कारणे/प्रसंगानिमित्त राज्य माफी जाहीर केली जाते. ह्या सर्व उपक्रमांचा एकूण उद्देश बंदी कारागृहात सद्‌वर्तनी व कामात मग्न राहून प्रशासनाला व त्याला स्वतःला मदत व्हावी असा आहे. बंद्यास ठरावीक कालावधीपर्यंत एकूण १/३ काळापेक्षा अधिक सूट मिळत नाही. तसेच सराईत गुन्हेगार व प्रशासकीय कारणास्तव रत्नागिरी विशेष कारागृह येथे पाठविण्यात आलेल्या बंदी इत्यादींना माफी देय नाही. एन. डी. पी. एस. ॲक्टमध्ये दिनांक २९ मे १९८९ नंतर शिक्षा झालेल्या कैद्यांना माफी देय नाही.

## २१. बंद्यांना अभिवचन व संचित रजेची सवलत

बंद्यांना प्रचलित नियमाप्रमाणे अभिवचन व संचित रजेची सवलत असते. बंद्यांना अभिवचन/संचित रजेवर सोडण्यासंदर्भात त्वरित निर्णय घेण्यासाठी निरनिराळ्या संबंधित अधिकाऱ्यांनी करावयाच्या कार्यवाहीसाठी कालावधी निश्चित करण्यात आले आहे.

| अ. क्र. | निर्णय घेण्याच्या कार्यवाहीतील मुख्य टप्पे | कार्यवाही करावयाचा कालावधी |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | बंद्याने अभिवचन/संचित रजेवर जाण्यासाठी करावयाच्या विनंती अर्जासाठी पूर्व मुदत. | २० दिवस |
| २ | वर उल्लेखिलेल्या अर्जावर कारागृह अधीक्षक तसे अर्ज प्राप्त झाल्यावर पोलीस अधीक्षक आणि विभागीय आयुक्त यांच्याकडे पाठविण्याचा कालावधी. | २ दिवस |

| अ. क्र. | निर्णय घेण्याच्या कार्यवाहीतील मुख्य टप्पे | कार्यवाही करावयाचा कालावधी |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| ३ | पोलीस अधीक्षकांना अशा प्राप्त झालेल्या अर्जावर आपला सविस्तर अहवाल विभागीय आयुक्तांकडे आणि कारागृह अधीक्षकांकडे पाठविण्याचा कालावधी. | १० दिवस |
| ४ | अभिवचन/संचित रजेसाठी अर्ज आणि त्यावरील पोलीस अहवाल प्राप्त झाल्यावर विभागीय आयुक्त/सक्षम अधिकारी यांनी त्यावरील निर्णय कळविण्याचा कालावधी. | ४ दिवस |
| ५ | सक्षम अधिकाऱ्यांचा अभिवचन/संचित रजेच्या मंजुरीचा संबंधित प्राप्त झाल्यावर कारागृह अधीक्षक यांनी करावयाच्या कार्यवाहीचा कालावधी. | ४ दिवस |

| | | |
|---|---|---|
| **अभिवचन रजा** | **विभागीय आयुक्त** .. | ३० दिवस मंजूर करतात. त्यामध्ये ६० दिवस रजा वाढ मंजूर करू शकतात. |
| | **अधीक्षक** .. | बंद्यांच्या कुटुंबातील व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर ही रजा मंजूर करू शकतात. |

अभिवचन रजा मंजूर केल्यानंतर त्यामध्ये वाढ करून घ्यावयाची असल्यास बंद्याने रजा वाढ मंजूर करण्यासाठी प्रथम संबंधित आयुक्त यांचेशी पत्रव्यवहार करणे आवश्यक आहे व त्यापुढील रजावाढ आवश्यक असल्यास शासनाला विनंती करणे आवश्यक आहे. मात्र रजावाढ मंजूर झाल्याशिवाय गैरहजर राहणे, हा कारागृहातील गुन्हा असून त्याबद्दल माफी कपातीची शिक्षा देण्याची तरतूद आहे.

**संचित रजा** .. विभागीय कारागृह उपमहानिरीक्षक १४ दिवस मंजूर करून १४ दिवस वाढ मंजूर करू शकतात. विशेष प्रसंगी रजेमध्ये मुदतवाढ करू शकतात परंतु मुदतवाढीचा कालावधी त्याचे शिक्षेमध्ये गणला जात नाही.

बंद्यांना झालेल्या शिक्षेच्या ठरावीक कालानंतर संचित रजा विभागीय कारागृह उपमहानिरीक्षक हे मंजूर करतात. ह्या रजेचा कालावधी शिक्षेत माफी म्हणून समजला जातो. ही रजा चांगल्या वर्तणुकीच्या बंद्यांसाठी सवलत आहे. परंतु तो बंद्यांचा हक्क नाही. तसेच भारतीय दंड विधान कलम ३९२ ते ४०२ अंतर्गत बंदी सदरच्या रजेस पात्र नाहीत.

खालील बंदी त्याचे शिक्षेच्या कालावधीनुसार संचित रजेसाठी पात्र ठरतात.--

(१) ज्यांना एक वर्षापेक्षा अधिक पण पाच वर्षांपर्यंत शिक्षा आहे, ते दरवर्षी १४ दिवस संचित रजेवर सुटण्यास पात्र ठरतात.

(२) ज्या बंद्याला ५ वर्षांपेक्षा अधिक शिक्षा झाली आहे, असे बंदी दर दोन वर्षांनी १४ दिवस संचित रजेवर जाण्यास पात्र ठरतील. मात्र ज्याला ५ वर्षांपेक्षा अधिक शिक्षा झाली आहे व ज्यांचा शिक्षेचा कालावधी ५ वर्षे बाकी आहे. असे कैदी दरवर्षी संचित रजेवर जाणेस पात्र आहेत.

(३) ज्या बंद्यांना जन्मठेप शिक्षा झाली असेल असे बंदी ७ वर्षांनंतर २ वर्षांतून एकदा संचित रजेवर जाण्याऐवजी वर्षातून एकदा रजेवर जाणेस पात्र आहेत. जन्मठेप शिक्षा झालेल्या बंद्यांना पहिली ७ वर्षे, दोन वर्षांतून एकदा संचित रजा मिळणेस पात्र आहेत. संचित रजेसाठी न्यायाधीन कालावधी हा शिक्षेत धरावयाचा आहे. संचित रजा मंजुरीचा पूर्ण अधिकार विभागीय कारागृह उपमहानिरीक्षक यांना आहे. जर बंदी संचित रजा वाढ मंजूर झाल्याशिवाय गैरहजर राहील तर हा कारागृहातील गुन्हा आहे. त्याबद्दल माफी कपातीची शिक्षा देण्यात येते.

## २२. बंदी अधिकारी पद्धत

**रात्र पहारेकरी.--**सिद्धदोष बंद्याने शिक्षेचा ठरावीक कालावधी भोगल्यानंतर, त्याची कारागृहातील चांगली वर्तणूक व मिळालेल्या माफीनुसार तो रात्र पहारेकरी या पदावर काम करण्यास पात्र होतो.

**सिद्धदोष अन्वेषक.--**सिद्धदोष रात्र पहारेकरी बंद्याने सहा (६) महिने शिक्षा भोगल्यानंतर त्याची कारागृहातील वर्तणूक चांगली व मिळालेल्या माफीनुसार तो सिद्धदोष या पदावर काम करण्यास पात्र होतो.

कारागृहातील उद्योगप्रिय, चांगली वर्तणूक व जबाबदारी सांभाळण्यास योग्य अशा बंद्यांना त्यांचा ठरावीक शिक्षेचा काळ झाल्यावर रात्र पहारेकरी व सिद्धदोष अन्वेषक अशी पदोन्नती देण्यात येते. या बंद्यांस कारागृह कायदा, १८९४ अन्वये शासकीय कर्मचारी म्हणून समजले जाते. या संवर्गाने कारागृहात बंद्यापासून ओळखण्यासाठी प्रचलित नियमानुसार वेगळे कैदी कपडे दिले जातात.

हा संवर्ग प्रशासनात आणि बंद्यात समन्वय व एक प्रकारचा दुवा म्हणून कार्यरत असतो.

## २३. बंदी कल्याण निधी

शासनाने बंद्यांसाठी बंदी कल्याण निधीची सोय केली आहे. या कल्याण निधीतून गरजू बंद्यांसाठी व त्यांच्या कुटुंबीयांसाठी आर्थिक मदत दिली जाते. तसेच बंद्यांचे शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, चष्मे, अपंगांसाठी कुबड्या, सुटलेल्या गरजू बंद्यांसाठी अवजारे खरेदी अशा प्रकारची मदत या निधीतून केली जाते.

## २४. रेसिप्रोकल ट्रान्सफर (आंतरराज्यात बंद्यांना बदली करण्याची सुविधा)

जे बंदी दुसऱ्या राज्यातील असतील आणि त्यांना महाराष्ट्रातील न्यायालयाकडून शिक्षा झाली असेल, अशा बंद्यांचे अपील निकालात निघाल्यावर बंद्यांच्या विनंतीवरून त्यांच्या मूळ राज्यातील जवळच्या कारागृहात पाठविण्याची सोय आहे. या सवलतीमुळे त्यांच्या नातलगांना तो वेळावेळी भेटून आपल्या कुटुंबीयांशी संबंध ठेवू शकतो. हा उपक्रम बंद्यांच्या पुनर्वसनातील एक भाग आहे. सदरचा निर्णय हा शासन स्तरावर होतो.

## २५. सल्लागार मंडळ व १४ वर्षीय अहवाल

असराईत दीर्घ मुदतीच्या शिक्षा लागलेल्या बंद्यांनी ठरावीक शिक्षा भोगल्यावर त्यांची प्रकरणे सल्लागार समितीपुढे पुनर्विलोकनार्थ ठेवण्यात येतात. या सल्लागार मंडळापुढे बंद्यांचे पूर्व इतिहास, गुन्हा घडण्यामागील कारणे, तसेच त्यांची कारागृहातील एकंदरीत वर्तणूक जमेस धरून त्यांच्या मुदतपूर्व सुटकेबाबत विचार करण्यात येतो. सल्लागार मंडळाच्या बैठका वर्षातून दोन वेळा घेण्यात येतात. हीच पद्धत जन्मठेप बंद्यांसाठी लागू असते. परंतु दिनांक १८ डिसेंबर १९७८ नंतर जन्मठेप शिक्षा लागलेल्या बंद्यांना सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कमीत कमी १४ वर्षे निव्वळ शिक्षा भोगणे आवश्यक आहे. तसेच बंद्यांच्या एकूण गुन्ह्यांची पार्श्वभूमी तसेच कारागृहातील वर्तणूक, बंद्यांचे स्वरूपाचे आजार व अतिवयोवृद्ध या गोष्टी जमेस धरून शासन, शासन अधिकारात प्राप्त झालेल्या अधिकारान्वये बंद्यांना माफीसह ठरावीक वर्षाच्या कालावधीनंतर सोडणेबाबत आदेश देते.

या एकूण प्रक्रियेचा उद्देश म्हणजे बंद्यांचे कारागृहातील सर्वसाधारण नियम पाळून कारागृह प्रशासनाकडून आयोजित केलेल्या उद्योगाचा पुरेपूर फायदा घेऊन मुदतपूर्व सुटून स्वतःच्या कुटुंबात पुनःस्थापित होणे असा आहे.

## २६. तक्रार पेटी

सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांचे सूचनेनुसार कारागृहात तक्रार पेटी ठेवण्यात येते. या तक्रार पेटीत बंद्यांनी कारागृह प्रशासनाविरुद्ध किंवा त्यांच्या अडचणी सोडवू शकले नसल्यास अशाबाबत लिखित स्वरूपात तक्रार या पेटीत अर्जाद्वारे टाकण्याची सोय आहे. ही तक्रार पेटी सीलबंद करून त्यांच्या चाव्या स्थानिक सत्र न्यायाधीशांकडे पाठविल्या जातात. सत्र न्यायाधीश वेळोवेळी या तक्रार पेट्या उघडून तक्रारीच्या पत्रांची दखल घेतात. अशीच दुसरी तक्रार पेटी ठेवून कारागृहातील बंदी त्यांच्या अडचणी प्रशासनासमोर मांडू शकतात. या तक्रार अर्जाचा निपटारा दर सोमवारी करण्यात येतो.

## २७. बंदी पंचायत व्यवस्था

बंद्यांमध्ये शिस्त, सहकार्याची तसेच एकंदरीत जबाबदारीची जाणीव व एक प्रकारचा आत्मविश्वास जागृत ठेवणेबाबत बंद्यांच्या पंचायतीचे गठन केले जाते. या पंचायतीत फक्त चांगल्या वर्तणुकीच्या बंद्यांना भाग घेण्यास परवानगी असते. कारागृहाच्या एकूण विस्ताराच्या मानाने असे किती पंच ठेवावे, हे प्रशासन ठरविते. पंचाची निवड झाल्यावर त्यांनी खालील बाबींबाबत लक्ष पुरवून प्रशासनाशी समन्वय साधून अडचणी दूर करणे असा उद्देश आहे.

(१) कारागृहातील स्वच्छता, (२) आरोग्य, (३) बंद्यांना देण्यात येणारे रोजचे जेवण व्यवस्थितपणे वाटणे, (४) बंद्यांना वेळोवेळी वैद्यकीय मदत मिळणेबाबत, (५) बंद्यांसाठी करमणुकीचे आयोजन करणे, (६) बंद्यांमध्ये एकोपा ठेवणे, (७) प्रशासनाला सर्वतोपरी मदत.

## २८. खुले कारागृह व खुल्या वसाहती

कारागृह प्रशासनाचा बंद्यांच्या पुनर्वसनाचा हा शेवटचा टप्पा आहे. महाराष्ट्रामध्ये येरवडा खुले कारागृह ही संस्था १९५६ साली अस्तित्वात आली आहे. पैठण खुले जिल्हा कारागृह ही संस्था १९६८ साली सुरू करण्यात आली आहे. तसेच स्वतंत्रपूर खुली वसाहत, आटपाडी, जिल्हा सांगली ही संस्था १९५६ साली सुरू झालेली आहे.

(अ) **खुले कारागृह**.--बंद कारागृहातील शिक्षा लागलेल्या दीर्घ मुदतीच्या बंद्यांची त्यांची ठरावीक काळ शिक्षा भोगल्यावर, तसेच गुन्ह्याच्या पूर्व इतिहास, बंद्यांची मानसिक, शारीरिक प्रकृती उत्तम आहे. आणि ज्यांना खुले कारागृहात जाण्याची इच्छा आहे, तसेच कष्टाची कामे करावयाची सवय आहे व कारागृहातील वर्तणूक चांगली आहे अशा बंद्यांची खुले कारागृहासाठी समितीकडून निवड केली जाते. निवड झाल्यावर माननीय कारागृह महानिरीक्षक यांच्या आदेशान्वये त्यांना येरवडा खुले कारागृह किंवा पैठण खुले जिल्हा कारागृह तेथे पाठविण्यात येते. पैठण खुले जिल्हा कारागृह येथे एकूण ३०० बंदी ठेवण्याची तसेच येरवडा खुले कारागृह येथे १५० बंदी ठेवण्याची क्षमता आहे. या दोन्ही कारागृहांत बंद्यांना मुख्यत: शेतीचे काम व विणकाम विभागात काम दिले जाते.

खुले कारागृहातील बंदी असल्यामुळे त्यांची सुरक्षा व्यवस्था ही कमी असते. खुले कारागृहातील बंद्यांना माफीची सवलत बंद कारागृहातील बंद्यांपेक्षा जास्त असते. बंद्यांवर निर्बंधही कमी प्रमाणात असतात. कारागृह प्रशासनाचा जास्तीत जास्त बंद्यांना खुले कारागृहात पाठविणे हा उद्देश असतो.

(ब) **खुली वसाहत.**--साधारणत: खुल्या कारागृहात खुल्या वसाहतीसाठी बंद्यांचा तपशील कारागृह महानिरीक्षक हे त्यांच्या अभिप्रायासह शासनाकडे पाठवितात. त्यानंतर शासन, गृह विभाग, शासनाला प्रदान केलेल्या अधिकारात त्यांना खुली वसाहत येथे पाठविण्याचे आदेश देते.

## (फ) कारागृहात बंद्यांना बाळगण्यास निषिद्ध असणाऱ्या वस्तू

कारागृहात एकूण शांतता, सुव्यवस्था राखण्यासाठी काही पथ्य पाळावयाचे असते. ज्या वस्तू नियमाने बंद्यांना बाळगण्यास मनाई आहे अशा वस्तू कारागृहात बाळगण्यास मज्जाव असतो. त्या वस्तूंना निषिद्ध वस्तू म्हणतात. साधारणत: खालील नमूद केलेल्या वस्तू कारागृहात बाळगण्यास निषिद्ध असतात.

१. मोबाईल.

२. दारू, स्पिरीट.

३. जुगारासाठीच्या वस्तू इत्यादी.

४. रोकड रक्कम.

५. भांग, गांजा, चरस, अफू, ब्राऊन शुगर इत्यादी मादक पदार्थ.

६. सोने, चांदी अशा मौल्यवान वस्तू.

७. पिस्तोल व इतर ज्वालाग्राही वस्तु. चाकू, सुरे.

८. बांबू, शिड्या, दांडे, काठ्या, दोर व तत्सम वस्तू जेणेकरून बंद्यांना पलायनासाठी, मारामारी वगैरेसाठी उपयोग होऊ नये.

# (ग) कारागृहातील बंद्यांनी शिस्तीबाबत पाळावयाचे मार्गदर्शन

बंद्यांना सवलती देणेबाबत तरतुदी आहेत. त्यांनी सवलतीचा फायदा घ्यावा. तसेच त्यांची काही कर्तव्येही असतात. ती खालीलप्रमाणे नमूद आहेत.

१. बंदीने कारागृह प्रशासनातील अधिकारी, लिपिक वर्ग, तांत्रिक कर्मचारी वर्ग तसेच बंदी अधिकारी यांच्या आज्ञा पाळाव्यात.

२. बंद्यांनी त्यांच्या कामाच्या जागा सोडून, सयुक्तिक कारणाशिवाय कोठेही जाऊ नये.

३. बंद्यांनी आपापसात भांडणे, ओरडणे, मोठ्याने गाणे म्हणणे हे निषिद्ध आहे.

४. कारागृहाच्या नियमाप्रमाणे व वेळापत्रकाप्रमाणे वागणे.

५. बंद्यांनी दिलेले कपडे व बिस्तरे स्वच्छ ठेवावेत व स्वतःही स्वच्छ रहावे.

६. कोणतेही मादक पदार्थ, उदाहरण दारू, गांजा, चरस या वस्तू जवळ बाळगू नयेत.

७. पळून जाण्याचा प्रयत्न करू नये.

८. जुगार खेळू नये, हंडी पेटवू नये.

९. सहकारी बंद्यांच्या वस्तू चोरू नयेत.

१०. स्वतःची कॅंटीन कूपन्स दुसऱ्यास देऊ नयेत.

११. सरकारी मालमत्तेचे नुकसान होऊ देऊ नये.

१२. बरॅक व परिसर स्वच्छ ठेवावा.

१३. प्रशासनाने नेमून दिलेलेच काम करावे.

१४. अधिकाऱ्यांचे आदेश पाळावेत.

१५. नेमून दिलेलेच काम करावे.

१६. गुन्हा करू नये व करणाऱ्यास मदत करू नये.

१७. अफवा उठवू नये.

१८. बंद्यांनी दिलेल्या कैदी कपड्यात बदल करू नये.

## (ह) बंद्यांना कारागृहात देण्यात येणाऱ्या शिक्षा

वरील परिच्छेदात बंद्यांनी कारागृहात कसे वागावे याबाबत थोडक्यात चर्चा केलेली आहे. बंद्यांने कारागृहात वर नमूद केलेल्या सर्वसाधारण नियमाचे उल्लंघन केल्यास कारागृह नियमावली त्या त्या कारागृहीन अपराधाबद्दलच्या स्वरूपानुसार कारागृहीन शिक्षेची तरतूद केलेली आहे. कारागृहीन शिक्षा खालीलप्रमाणे असते.

(१) ताकीत देणे, (२) माफी कापणे, (३) कामात बदल करणे, (४) पदावनत करणे, (५) विभक्त कोठडीत बंद करणे, (६) ठरावीक काळासाठी उपाहारगृह व भेटीची सवलत बंद करणे व अशा तत्सम शिक्षा, (७) न्यायालयाच्या परवानगीने हातकडी व  दंडाबेडी काही क्वचित प्रसंगी देण्याची शिक्षा दिली जाते.

## (ज) बंद्यांच्या हक्काची जोपासना

महाराष्ट्र कारागृह नियमावली ही बंद्यांच्या सर्वतोपरी कल्याणासाठी, त्यांचा आशावाद ज्वलंत ठेवण्यासाठी अनेक औद्योगिक प्रशिक्षण देऊन तसेच माणूस म्हणून वागणूक देऊन, तो सुटल्यानंतर समाजात व कुटुंबात पुन:स्थापित होणे असे आहे. परंतु इतर काही राज्यांतील कारागृहात त्यांच्या मूलभूत हक्कांचे कारागृह प्रशासनाकडून उल्लंघन झालेले दिसून आले म्हणून निरनिराळ्या संस्था उदाहरणार्थ सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय, राष्ट्रीय मानवी हक्क आयोग यांनी दखल घेतलेली आहे.

## (ल) भारतीय घटनेने प्रदान केलेले हक्क

भारतीय घटनेतील अनुच्छेद २१ अन्वये मानसिक व शारीरिक प्रकारच्या त्रासापासून बंद्यांना संरक्षण भारतीय घटनेतील अनुच्छेद २१ अन्वये कोणत्याच प्रकारचा मानसिक व शारीरिक छळ होता कामा नये. जर अशा प्रकारचे कृत्य झाल्यास सक्षम न्यायालय अशा बाबींची दखल घेते. तसेच बंद्यांना कारागृहातील

राहणीमान, स्वच्छता व इतर बाबींबाबत या कलमात तरतूद आहे. (Rakesh Kaushik *versus* B. L. Vig Superintendent, Central Jail Delhi A. I. R. 1981, S. C. 746) दुसऱ्या एका प्रकरणात भारतीय घटनेअंतर्गत (*vide* Sunil Batra (II) *versus* Delhi Administration A. I. R. 1980, S. C. 1579) बंद्यावर झालेल्या शारीरिक अन्यायाबद्दल सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी गंभीरपणे दखल घेतलेली आहे.

तसेच बऱ्याच प्रकरणात सर्वोच्च न्यायालय, यांनी वेळोवेळी दंडाबेडी, हातकडी तसेच बंद्याला एकांतवासाची (Solitary Confinement) शिक्षा देण्याबाबत व मार्गदर्शनपर आदेश दिलेले आहेत.

## (म) बंद्यांना मोफत कायदेविषयक मदत/सल्ला

बऱ्याच प्रकरणात नजीकच्या काळात बंद्यांना कायदेविषयक मदत मिळणेबाबत सविस्तर चर्चा करून मार्गदर्शनपर आदेश सर्वोच्च न्यायालयाने काढलेले आहेत. याबाबत प्रकरणात संदर्भ म्हणून [ M. H. Hoskct *versus* State of Maharashtra (1978 (3) S. C. C. 544 A. I. R. 1978 S. C. 1548] या प्रकरणात देखील भारतीय घटनेच्या 21 व्या अनुच्छेदाचे उल्लंघन झालेले आहे. यात बंद्याची स्वतःचे वकील नेमण्याची परिस्थिती नसेल, तो गरीब असेल किंवा त्यांच्यातर्फे कोणीच नातलग अथवा मदत करणेबाबत मार्गदर्शनपर आदेश दिलेले आहेत. यात खालील बाबींचा समावेश असतो.--

(१) न्यायनिर्णयाची प्रत विनामूल्य कोर्टाने अपील करण्याचे मुदतीत पुरविली पाहिजे.

(२) कारागृह प्रशासनाने त्याची याचिका किंवा अपील करणेबाबत सर्वतोपरी साहाय्य करावे.

(३) या संदर्भात बंद्याला कायदेशीर सल्ला देण्यासाठी शासनाकडून मोफत वकील दिला पाहिजे. यासाठी शासनाने सर्व कारागृहांसाठी कार्यसमुपदेशक यांची नेमणूक केली आहे.

या विषयांतर्गत सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी खालील प्रकरणात दखल घेतलेली आहे.--

Khatri *versus* State of Bihar (S. C. 928) Bhagalpur Blinding Case. Sheela Barse versus State of Maharashtra (AIR 1983, S. C. 378)

Sukdas *versus* Union Terriroty Arunachal Pradesh (AIR 1986, S. C. 99) 1986 (2) S. C. C. 401, Nandini Satpaty *versus* P. L. Dani (AIR 1978, S. C. 1025).

वरील एकंदरीत प्रकरणात भारतीय घटनेने प्रदान केलेल्या हक्कांचे उल्लंघन झाल्यास भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने दखल देऊन मार्गदर्शन केलेले आहे. या सर्व बाबी लक्षात घेऊन कारागृह प्रशासनाने खाली नमूद केलेल्या बाबींचे कटाक्षाने पालन करणे अपेक्षित आहे.--

(१) कायदेविषयक मदत व सल्ला हा बंद्यांचा मूलभूत हक्क गरजू व गरीब बंद्यांना वेळोवेळी उपलब्ध करून देणे हे कारागृह प्रशासनाचे कर्तव्य आहे.

(२) जे बंदी स्वत: कायदेविषयक मदतीची व सल्ल्याची व्यवस्था करू शकत नाहीत, अशा बंद्यांना शासनाने ती मदत मोफत उपलब्ध करून देणे हे भारताच्या घटनेनुसार परमकर्तव्य असेल.

(३) बंद्यांच्या अटक झाल्याच्या तारखेपासून कोर्टात प्रकरण चालून शेवटी अपील करून तसेच संपूर्ण अपिलाचा निर्णय होईपर्यंत तसेच बंदी न्यायाधीन किंवा शिक्षा लागलेले त्यांना कायदेविषयक मदत देणे हे कारागृह प्रशासनाचे कर्तव्य आहे.

(४) शासनाचे कर्तव्य आहे की, त्यांनी त्या आरोपीला मोफत कायदेविषयक सल्ला मिळू शकतो याची जाणीव करून देणे.

(५) ज्या न्यायाधीन बंद्यांना शासनाकडून त्यांची बाजू मांडण्यासाठी कायदेशीर मदत देण्यात आली नसेल. त्याचा परिणाम म्हणून त्याला न्यायालयाने शिक्षा दिलेली असेल. अशा प्रकरणात दिलेली शिक्षा या कारणांमुळे रद्दबातल होऊ शकते.

मोफत कायदेविषयक सल्ला व मदत गरजू बंद्यांना खालीलप्रमाणे देणे आपेक्षित आहे.

कायदेविषयक सल्ला लिखित स्वरूपात किंवा तोंडी सल्ला संबंधित बंद्यास देणे ही बाब त्या त्या प्रकरणाच्या एकूण स्वरूपानुसार असेल.

**कायदेविषयक मदत**

(१) कोर्टाची फी, साक्षीदारांचा खर्च तसेच प्रकरण चालू असताना इतर संकीर्ण खर्चाची जी काही देय असलेली रक्कम.

(२) बंद्यांकडून वकील नेमण्याबाबत.

(३) न्यायनिर्णयाची प्रत मोफत उपलब्ध करून देणे.

(४) अपील पेपर बुक्स यांची छपाई, भाषांतर इत्यादीबाबत मदत.

(५) अपिलाचा एकूण मसुदा (Drafting) तयार करणे.

**न्यायाधीन प्रकरणे लवकर निकाली काढणेबाबतचे मूलभूत हक्क**

भारताच्या एकूण कायदेविषयक बाबीत बंद्यांची न्यायाधीन प्रकरणे वेगाने व लवकर निकाली काढणे याबाबत हक्क समजला गेला आहे. एकूण विलंब प्रशासनाकडून होत असेल तर त्या विलंबास बंदी जबाबदार नसून तो न्यायाधीन कोठडीत असेल, अशा बंद्यांना निकाल लागण्याआगोदर त्याच्यावरील असलेले आरोप लक्षात न घेता विनाशर्त मुक्त केले पाहिजे. फौजदारी प्रक्रिया, 1973 (Criminal Producedure Code, 1973) अन्वये तत्सम कारवाईची तसेच न्यायाधीन प्रकरण लवकर निकाली काढणेबाबत तरतूद आहे.

फौजदारी प्रक्रिया संहिता कलम क्रमांक 167 *(5)* अन्वये फौजदारी प्रकरणातील चौकशी बंद्यांच्या अटकेपासून सहा महिन्यांचे आत संपविली पाहिजे. अन्यथा संबंधित न्यायालय, पुढील चौकशी थांबवून प्रकरण निकाली काढू शकते. जर सयुक्तिक कारणामुळे न्यायालयाचे समाधान झाले तरच सहा महिन्यांपेक्षा जास्त मुदत वाढवून मिळू शकते या पद्धतीप्रमाणे Jagannath Naidu *versus* State of Madras (India Today October 1983 "Ending a Long Wait").

सदर प्रकरणात तामिळनाडू हायकोर्टाने सगळ्या दुय्यम न्यायालयांना असे आदेश दिले आहेत की, पोलिसांनी एफ. आय. आर. प्रलंबित ठेवून अटकेनंतर न्यायाधीन बंद्यांवर सहा महिन्यांचे आत (Charge Sheet) न दिल्यामुळे निर्दोष सोडण्याचे आदेश दिलेले आहेत. यामुळे निरनिराळ्या कारागृहातील अनेक न्यायाधीन बंद्यांना, जे वर्षानुवर्षे कारागृहात पडून होते, याचा फायदा मिळाला.

## (न) राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची अपेक्षा

महाराष्ट्र कारागृह नियमावली, १९७९ ही बंद्यांचे एकूण हित लक्षात घेऊन गठीत केली आहे. परंतु काहींबाबतीत प्रशासनातील काही घटकांद्वारे याबाबत उल्लंघन झाल्याचे दिसून आल्यावर त्यांची राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाने दखल घेतलेली आहे. परिणामत: नियमातील तरतुदीप्रमाणे खालील नमूद बाबींबाबत मानवी हक्क आयोग जागृत असल्याचे दिसून आलेले आहे.

(अ) बंद्यांसाठी निवारा.

(ब) बंद्यांसाठी अन्न, वस्त्र, करमणुकीचे साधन.

(क) बंद्यांना कैदेशिवाय इतर अनावश्यक बंधने सुरक्षा सबबीखाली राबविणे.

(ड) बंद्यांसाठी स्वच्छ परिसर असावा, जेणेकरून त्यांचे आरोग्य अबाधित राहील.

(इ) कारागृहातील तसेच पोलीस कोठडीतील मृत्यू व बलात्कार इत्यादी.

(फ) कारागृहातील वैद्यकीय सुविधा.

# (प) कारागृह/कार्यालयामार्फत बंद्यांना पुरविण्यात येणाऱ्या सेवा/सेवा पुरविणारा अधिकारी इत्यादीबाबत तपशील

| अ. क्र. | विभागाकडून/ कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा | बंद्यांना कारागृहामध्ये पुरविण्यात येणाऱ्या सेवा | सेवा पुरविणारा अधिकारी | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्याच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्यांचा दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | बंद्यांना भेटीची सुविधा. | बंद्यांना त्यांच्या वर्गवारी-नुसार भेटीची सवलत दिली जाते. वकिलांना न्यायालयीन काम व कायदे विषयक सल्ल्या-साठी अधीक्षकांच्या परवानगीने भेटता येते. प्रत्येक भेट **विनामूल्य** देण्यात येते. | कारागृह अधीक्षक | कारागृह उपमहानिरीक्षक |

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| २ | तक्रार व निवारण. | न्यायालयाचे आदेशाने बंद्यांच्या तक्रारीसाठी तक्रार पेटी ठेवून त्यांच्या तक्रारीचे निवारण केले जाते. सदर तक्रार पेटीची चावी सत्र न्यायालयाकडे असते. | कारागृह अधीक्षक | |
| ३ | योगासन व मेडिटेशन. | बंद्यांच्या आरोग्यासाठी व स्वास्थ्यासाठी योगा-सने वर्ग, विपश्यना वर्ग इत्यादींचे आयोजन केले जाते. | | |
| ४ | संचित रजा | १४ दिवस संचित रजा मंजूर करणे आणि १४ दिवस त्यामध्ये वाढ करणे. | कारागृह उपमहानिरीक्षक | |
| ५ | अभिवचन रजा | ३० दिवस रजा मंजूर करणे व ९० दिवस रजेत वाढ करणे. | विभागीय आयुक्त | |
| ६ | मुलांचे शिक्षण | स्त्री बंद्यांच्या ४ वय वर्षांच्या अतील मुलांना कारागृहामध्ये बालवाडीची व्यवस्था करण्यात येते. तसेच त्यांच्यासाठी खेळणी व पोषक अन्नाची व्यवस्था | कारागृह अधीक्षक | |

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| | | आहे. | | |
| ७ | खुले कारागृह व वसाहती. | बंद्यांच्या पुनर्वसनासाठी बंदिस्त कारागृहातून निवड समितीमार्फत बंद्यांची खुल्या कारागृहात व खुल्या वसाहतींमध्ये निवड होते. | कारागृह महानिरीक्षक | |
| ८ | सांस्कृतिक कार्यक्रम. | कारागृहात बंद्यांकरिता वेगवेगळ्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. | कारागृह अधीक्षक | |
| ९ | विशेष माफी | सिद्धदोष बंद्यांना उल्लेखनीय कामाबद्दल विशेष माफी दिली जाते. | कारागृह महानिरीक्षक, कारागृह उपमहानिरीक्षक व अधीक्षक | |

# (र) गृह (तुरुंग) विभाग व विभागाच्या नियंत्रणाखालील क्षेत्रीय कार्यालयाचे दूरध्वनी क्रमांक

# गृह (तुरुंग) विभाग

## मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

**माननीय उपमुख्यमंत्री : दूरध्वनी क्रमांक (कार्यालय) - २२०२५०१४, २२०२२४०१.**

**माननीय राज्यमंत्री : दूरध्वनी क्रमांक (कार्यालय) - २२०२५९३३, २२०२९२५९.**

| अ.क्र. | अधिकारी/पदनाम | कार्यासन क्रमांक | खोली क्रमांक | कार्यालय दूरध्वनी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | अपर मुख्य सचिव .. | -- | ५२१ मुख्य | २२०२९९५९ |
| २ | प्रधान सचिव .. | -- | ५४१ मुख्य | २२०२८६४८ |
| ३ | उपसचिव .. | -- | ५४५ मुख्य | २२०२८६८८ |
| ४ | कक्ष अधिकारी .. | पीआरएस-३ | ५४५ मुख्य | २२०२५१५७ |
| ५ | कक्ष अधिकारी .. | पीआरएस-१ | ५४५ मुख्य | २२०२५१५७ |
| ६ | कक्ष अधिकारी .. | पीआरएस-२ | ५४५ मुख्य | २२०२५१५७ |

# कारागृह महानिरीक्षणालय, पुणे-४११ ००१

| अ.क्र. | अधिकारी/पदनाम | एस.टी.डी. | कार्यालय दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे.. | ०२० | २६१२३५६३ |
| २ | कारागृह उपमहानिरीक्षक (मुख्यालय), पुणे .. | ०२० | २६१२३०११ |
| ३ | स्वीय सहायक .. | ०२० | २६१२५०५६ |

# पश्चिम विभाग, येरवडा, पुणे-४११ ००६

| | | | |
|---|---|---|---|
| १ | कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, पुणे | ०२० | २६६९४५२८ |
| २ | अधीक्षक, येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे .. | ०२० | २६६९२६६३ |
| ३ | अधीक्षक, येरवडा खुले कारागृह, पुणे .. | ०२० | २६६९४०५१ |
| ४ | अधीक्षक, कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह .. | ०२३१ | २३२४२१९ |
| ५ | अधीक्षक, कोल्हापूर जिल्हा कारागृह .. | ०२३१ | २५४०३१५ |
| ६ | अधीक्षक, विसापूर जिल्हा कारागृह .. | ०२४८७ | २५४३०२ |
| ७ | अधीक्षक, सातारा जिल्हा कारागृह .. | ०२१६२ | २३३८५० |
| ८ | अधीक्षक, सांगली जिल्हा कारागृह .. | ०२३३ | २३७३२१६ |
| ९ | अधीक्षक, सोलापूर जिल्हा कारागृह .. | ०२१७ | २६२५७०९ |
| १० | अधीक्षक, आटपाडी खुली वसाहत .. | ०२३४३ | २२००८० |
| ११ | अधीक्षक, अहमदनगर जिल्हा कारागृह .. | ०२४१ | २३४४७८९ |
| १२ | अधीक्षक, येरवडा महिला कारागृह .. | ०२० | २६६१३७९६ |

# दक्षिण विभाग, भायखळा, मुंबई

| अ.क्र. | अधिकारी/पदनाम | एस.टी.डी. | कार्यालय दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | कारागृह उपमहानिरीक्षक, दक्षिण विभाग, मुंबई | ०२२ | २३०७४५०८ |
| २ | अधीक्षक, मुंबई मध्यवर्ती कारागृह .. | ०२२ | २३०७७३७२ |
| ३ | अधीक्षक, ठाणे मध्यवर्ती कारागृह .. | ०२२ | २५३४६३८० |
| ४ | अधीक्षक, भायखळा जिल्हा कारागृह .. | ०२२ | २३०८८१३३ |
| ५ | अधीक्षक, कल्याण जिल्हा कारागृह .. | ०२५१ | २३१४५८० |
| ६ | अधीक्षक, रत्नागिरी जिल्हा कारागृह .. | ०२३५२ | २२२३७० |
| ७ | अधीक्षक, सावंतवाडी जिल्हा कारागृह .. | ०२३६३ | २७२०४५ |
| ८ | अधीक्षक, अलिबाग जिल्हा कारागृह .. | ०२१४१ | २२२०५२ |

## मध्य विभाग, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | कारागृह उपमहानिरीक्षक, मध्य विभाग, औरंगाबाद. .. | ०२४० | २३८१०४८ |
| २ | अधीक्षक, औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह .. | ०२४० | २३८१०५१ |
| ३ | अधीक्षक, नाशिक रोड मध्यवर्ती कारागृह .. | ०२५३ | २४६५२७६ |
| ४ | अधीक्षक, किशोर सुधारगृह मध्यवर्ती कारागृह | ०२५३ | २५७२७६५ |
| ५ | अधीक्षक, पैठण खुली कारागृह .. | ०२४३१ | २२३०४९ |
| ६ | अधीक्षक, धुळे जिल्हा कारागृह .. | ०२५६२ | २३५०४४ |
| ७ | अधीक्षक, बीड जिल्हा कारागृह .. | ०२४४२ | २२२३७० |

| अ.क्र. | अधिकारी/पदनाम | एस.टी.डी. | कार्यालय दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | **मध्य विभाग, औरंगाबाद**--चालू | | |
| ८ | अधीक्षक, नांदेड जिल्हा कारागृह | .. ०२४६२ | २३४१०४ |
| ९ | अधीक्षक, परभणी जिल्हा कारागृह | .. ०२४५२ | २३१३३९ |
| १० | अधीक्षक, उस्मानाबाद जिल्हा कारागृह | .. ०२४७२ | २२२२५० |
| ११ | अधीक्षक, जळगाव जिल्हा कारागृह | .. ०२५७ | २२२८६९७ |
| | **पूर्व विभाग, नागपूर** | | |
| १ | कारागृह उपमहानिरीक्षक, पूर्व विभाग | .. ०७२२ | २२४८८४४ |
| २ | अधीक्षक, नागपूर मध्यवर्ती कारागृह | .. ०७१२ | ४६६१४१३ |
| ३ | अधीक्षक, अमरावती मध्यवर्ती कारागृह | .. ०७११ | २६६२०८३ |
| ४ | अधीक्षक, अकोला जिल्हा कारागृह | .. ०७२४ | २४३५००५ |
| ५ | अधीक्षक, चंद्रपूर जिल्हा कारागृह | .. ०७१७२ | २५०७०३ |
| ६ | अधीक्षक, यवतमाळ जिल्हा कारागृह | .. ०७२३२ | २४४३२६ |
| ७ | अधीक्षक, भंडारा जिल्हा कारागृह | .. ०७१८४ | २५२२५८ |
| ८ | अधीक्षक, बुलढाणा जिल्हा कारागृह | .. ०७१६२ | २४२३१४ |
| ९ | अधीक्षक, वर्धा जिल्हा कारागृह | .. ०७१५२ | २४०१६२ |

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६